शुक्रवार, २६ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १६१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

26 January
Republic Day

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 26 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-161 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# मराठा तुफान मुंबईत





## मज्जा करण्यासाठी आलो नाही : मनोज जरांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लाखोंच्या संख्येनं मोर्चेकरी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत धडकले आहेत. मनोज जरांगे-पाटील २६ जानेवारीपासून आझाद मैदान आंदोलन करणार आहेत.

दरम्यान आझाद मैदानात आंदोलन करण्यास मुंबई पोलिसांनी गुरुवारी परवानगी नाकारली होती. मात्र मनोज जरांगे आझाद मैदानावर उपोषण करण्यावर ठाम आहेत. आंदोलनासाठी पोलिसांनी खारघर येथील मैदान सुचवले होते. लाखोंच्या संख्येने मोर्चेकरी वाहनांसह मुंबईत आल्याने मुंबईत दैनंदिन जनजीवन विस्कळीत होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्याच पार्श्वभूमीवर आझाद मैदानावर मनोज जरांगे-पाटील यांना आंदोलन करण्यास पोलिसांनी परवानगी नाकारली होती.

नवी मुंबईमधील खारगर येथील सेंट्रल पार्कमधील आंतरराष्ट्रीय मैदानाचा पर्याय पोलिसांनी आयोजकांना सुचवला होता. आझाद मैदानावर व्यासपीठ उभे राहिले आहे, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे-पाटील यांनी दिली आहे.


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कुठलाही संवाद झाला नाही. आम्हाला तोडगा काढायचा आहे. मज्जा करण्यासाठी मुंबईला आलो नाही. जेवढे मुंबईचे हाल होणार आहेत, तेवढं आमचेही हाल होत आहेत. दोघांचेही हाल होऊ द्यायचे नाही, हे सरकारच्या हातात आहे, असे जरांगे-पाटलांनी म्हटले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः चर्चेस यावे, ही माझी विनंती आहे. आम्हाला मुंबईला येण्याची हौस नाही. तिघांनी तोडगा काढावा, असे मनोज जरांगे-पाटील म्हणाले.


### मराठा आरक्षणासंदर्भात सरकार अजूनही सकारात्मक : मुख्यमंत्री




सरकार अजूनही मराठा आरक्षण देण्यावर ठाम आहे. मराठा आरक्षणासंदर्भात सरकारची भूमिका काल आज आणि उद्याही तीच राहणार आहे. मराठा आरक्षणासंदर्भात सरकार अजूनही सकारात्मक आहे. सरकार मराठ्यांना आरक्षण देण्याच्या मनस्थितीत आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ओबीसी आणि इतर कोणत्याही जातीच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला सरकार आरक्षण देणार आहे. मागास वर्ग आयोग त्यासंदर्भात कामाला लागले आहे. १ लाख ४० हजार लोकांचे काम मराठा आरक्षणासंदर्भात तीन शिफ्टमध्ये सुरू आहे. तर कुणबी नोंदी जिथे सापडतात त्यांना कुणबी आरक्षण देण्याचे काम सुरू असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

नवी मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांना भेट घेऊन मार्ग बदलण्याची विनंती केली. विशेष म्हणजे यावेळी कागदपत्रांवरील सहीचा विषय चर्चेत आला. मनोज जरांगे यांनी काही कागदपत्रांवर सही केल्याची माहिती समोर आली. पोलिसांसोबत चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सहीबाबत विचारले तेव्हा त्यांनी सहीचा किस्सा सांगितला. कुणीतरी आपल्याला गोड बोलून, फसवणूक केली आणि सही नेली, असे मनोज जरांगे यांनी सांगितले. संबंधित व्यक्तीने कोर्टाचे कागदपत्रे असल्याचे म्हणत दोन कागपत्रांवर सही केली.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

शंभर नेत्र असलेले रूप तिने धारण केले म्हणून तिला शताक्षी म्हणू लागले. त्यानंतर देवीने ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेल्या दुर्गम राक्षसाचा त्याच्याशी भयंकर युद्ध करून संहार केला. त्यामुळे शाकंभरी दुर्गा या नावाने प्रसिद्ध झाली. देवीने वनात निवास केला म्हणून तिला बनशंकरी असेही म्हटले जाऊ लागले. याच देवीला रक्तदंती, भ्रामरी अशी विविध नावे आहेत. त्या प्रत्येक नावामागे एक विशिष्ट अशी कथा आहे. बदामी व्यतिरिक्त शाकंभरी देवीची देशभरात अनेक ठिकाणी मंदिरे आहेत. त्यातील हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या शिवालिक पर्वत श्रेणीमध्ये वेगवेगळ्या रूपांनी ही आदिशक्ती वास करते आहे. महाराष्ट्रात सोलापूर, बेळगाव, नागेवाडी ( सातारा ), बनाळी ( सांगली जिल्हा, जत तालुका ), कुरुंदवाड ( ता. शिरोळ, जि . कोल्हापूर ), बुधगाव ( सांगली ), विटा ( ता. खानापूर जि सांगली ), कुंभोज ( ता. हातकणंगले जि कोल्हापूर ), पुणे परिसरात वडगाव शेरी, पिंपळे निलख तसेच बारामती, आष्टा, इचलकरंजी इ. ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे विजयवाडा, आंध्र प्रदेश येथे कनकदुर्गा या नावाने शाकंभरी मातेचे मंदिर आहे. बंगळुरू, धारवाड, बेळगाव, चेन्नई, वारंगळ, सकराय आणि सांभर ( राजस्थान ) आदी ठिकाणी पण देवीची मंदिरे आहेत. मूर्ती आणि मंदिरांच्या रूपाने स्थूल रूपाने ही देवी विविध ठिकाणी वास्तव्य करीत असली तरी ती सर्वव्यापी आहे. शाकंभरी देवी शीघ्र फलदायिनी, वरदायिनी आहे. मनोभावे भक्ती करणाऱ्यांचे मनोरथ देवी पूर्ण करते. चारही वर्णातील लोकांची ही कुलदेवता आहे. ज्यांची कुलदेवता शाकंभरी आहे, त्यांनी दररोज तिची उपासना अवश्य करावी. ज्यांना तेही शक्य होत नाही त्यांनी या पौषमासातील शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा अशी तरी तिची विशेषोपासना करावी.






## आनंदी पहाट

### तणाव व्यवस्थापनाचा फारसा ताण घेऊ नये

आधुनिक केसरी

तणाव व्यवस्थापन आपल्या जीवनातील तणाव आणि अडचणी, ज्याला प्रतिकूलता देखील म्हणतात, याला चांगल्या प्रकारे सामोरे जाण्यास मदत करण्यासाठी अनेक मार्ग, पर्याय उपलब्ध असतात. तणावाचे व्यवस्थापन करणे आपल्याला अधिक संतुलित, निरोगी जीवन जगण्यास मदत करू शकते. तणाव हा एखाद्या कठीण प्रसंगाला आपोआप शारीरिक, मानसिक आणि भावनिक प्रतिसाद देत असतो. तो प्रत्येकाच्या जीवनाचा एक सामान्य भाग असल्याचे स्पष्ट होते. आपणा विचारांचा सकारात्मक वापर केल्यास, ताण वाढल्यामुळे आपल्या कृतीमध्ये बदल होऊ शकतो. परंतु नकारात्मक विचार, दीर्घकालीन तणाव आपल्या जीवनाची गुणवत्ता कमी करू शकतात. तणाव व्यवस्थापन पद्धतींमध्ये अनेक विषय समाविष्ट असल्याचे आपण समजून घेतले पाहिजे. समस्या सोडवणे, महत्त्वाच्या कामांवर प्रथम लक्ष केंद्रित करणे आणि आपला वेळ व्यवस्थापित करणे; यासारखी कौशल्ये शिकणे आवश्यक असते. जीवनात घडणाऱ्या कठीण प्रसंगांना



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

तोंड देण्याची तुमची क्षमता सुधारणे गरजेचे असते. आपण आपली भावनिक जागरूकता आणि प्रतिक्रिया कशी सुधारायची हे आपण शिकू शकतो. आपल्या मानसिक पातळीवरील नियंत्रणाची भावना कशी वाढवायची हे देखील आपण शिकू शकतो. यामुळे आपल्याला जीवनात अधिक अर्थ आणि उद्देश सापडेल त्यामध्ये अधिक कृतज्ञता आणि आशावाद असेल. खोल श्वास घेण्याचा सराव करणे, योग करण्यासाठी वेळ राखून ठेवणे, ध्यान करणे, नियमित व्यायाम करणे आणि उपलब्ध वेळेनुसार ठरविक वेळेला प्रार्थना म्हणणे, यासारख्या तंत्रांचा सराव करावा. आपले वैयक्तिक संबंध सुधारणे देखील आवश्यक असते. तणावामुळे आपल्याला राग येतो; तणाव निवारक कृती आपल्या व्यस्त जीवनात शांतता परत आणण्यास मदत करू शकतात. तणाव निवारण्यासाठी आपल्याला जास्त वेळ देण्याची किंवा विचार करण्याची गरज असते.



आधुनिक केसरी

### ज्ञानाच्या भक्तीत | एक व्हावे ||

संत वचनांचा | करूनी स्विकार ||
जाळूनी विकार | शुद्ध व्हावे ||१||
आभ्यासे साधता | स्वतःशी संवाद ||
योग्य प्रतिसाद | देव देतो ||२||
व्यसनाशी संग | साधु नये कधी ||
भ्रष्ट होय बुध्दी | वागु नये ||३||
असावा सात्विक | वागण्यात हेतू ||
बांधु नये सेतू | मत्सराचा ||४||
चारित्र्याची गंगा | वाहावी रक्तात ||
ज्ञानाच्या भक्तीत | एक व्हावे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

मान कांपे चळचळां । डोळे गळती भळभळां ।
वृद्धपणीं अवकळा । ठाकून आली ॥ ३८ ॥
दंतपाटी उखळली । तेणें बोचरखिंडी पडिली ।
मुखीं लाळ गळों लागली । दुर्गंधीची ॥ ३९ ॥
डोळां पाहातां दिसेना । कानीं शब्द ऐकेना ।
दीर्घ स्वरें बोलवेना । दमा दाटे ॥ ४० ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

विराग कारिणी आलसी,
मंद वीर्य चहै मान ।
चंचल चित्त विश्वास हिन, मूढ़
नीचत्ता जान ।।०७।। (स्वर्वेद षष्ठ
मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/०७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
वैराग्यवान आहे, पण रोगग्रस्त,
आळशी, अकर्मण्य, मान-प्रतिष्ठेचा
इच्छूक, चंचल चित्त असलेला,
विश्वासहीन तसेच जड बुद्धि वाला
जो जिज्ञासू आहे, तो निम्न कोटिचा
आहे, असे समजले पाहिजे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

स्वतः विदेही असलेला पुरूष दुसऱ्या विदेही पुरूषाला पाहुन हरवून जातो.देहभान विसरतो.एखादा भ्रष्ट अज्ञानी माणूस आणि जीवनमूल्ये जाणणारा दोघेही शरिराने, सारखेच दिसतात म्हणून त्या दोघांची योग्यता सारखीच न मानणारा विचारी असतो. तर आत्मज्ञानी पुरूषाचे मोठेपण हे त्यांच्या स्वस्वरूपाशी आत मधील.स्थिती आहे. म्हणून आत्मज्ञानी पुरूषाचे मोठेपणा जाणून घेण्यासाठी आपल्याला अनुभवा पर्यंत पोहचावे लागते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## सगुणभक्ति

आधुनिक केसरी

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले.



पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ' सहजसमाधी ' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

**२७६. नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

म्हणून विचारल्यावरून लोकांनीं त्यास सांगितले कीं, तुमच्या पूर्वजांच्या आहेत. मठात कान्होबा, पर्वती, मच्छिंद्र, त्याच्या पूर्वेस जालंदर, त्याच्या पलीकडे गहिनीनाथ असे ऐकून त्याने तीं नावे पालटून दुसरी ठेविली, तीं अशीं: जानपीर असें नांव जालंदरास दिलें. गैरीपीर हें नांव गहिनीनाथास ठेविलें. मच्छिंद्राचें मायाबाबलेन व कानिफाचें कान्होबा अशी नांवें ठेवून तेथें यवन पुजारी ठेविले. कल्याण कलयुगीं बाबाचैतन्य यांची समाधि होती, पण तें नांव बदलून राववागशर असें नांव ठेविलें. गोरक्ष आपल्या आश्रमीं सटव्यांस ठेवून तीर्थयात्रेस गेला.

नवनाथ बहुत दिवसपर्यंत तीर्थयात्रा करित होते. शके सत्राशे दहापर्यंत ते प्रकटरूपाने फिरत होते. नंतर गुप्त झाले. एका मठीमध्ये कानिफा राहिला. त्याच्याजवळ पण वरच्या बाजूने मच्छिंद्रनाथ ज्याच्या बायबा असे म्हणतात तो राहिला. जालंदनाथास जानपीर म्हणतात, तो गर्भगिरोवर राहिला आणि त्याच्या खालच्या बाजूस गहिनीनाथ त्यासच गैरीपीर म्हणतात. वडवाळेस नागनाथ व रेवणनाथ वीटगांवी राहिला चरपटीनाथ, चौरंगीनाथ व अंडबंगी नाथ गुप्तरूपाने अद्याप तीर्थयात्रा करीत आहेत. भर्तरी ( भर्तृहरि ) पाताळी राहिला. मीननाथाने स्वर्गास जाऊन वास केला. गिरिनारपर्वती श्रीदत्तात्रेयाच्या आश्रमात गोरक्षनाथ राहिला. गोपीचंद्र व धर्मनाथ हे वैकुंठास गेले. मग विष्णूने विमान पाठवून मैनावतीस वैकुंठास नेले. चौऱ्यांयशी सिद्धांपासून नाथपंथ भरभराटीस आला.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २६ जानेवारी २०२४

adhunikkesari.com Adhunik Kesari


# गोंडपिपरीतील चिंतामणी महाविद्यालयात नमो नवमतदाता संमेलन

## पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आभासी मार्गदर्शनाचे सामूहिक दृकश्रवण

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आज राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने देशभरातील तमाम नवमतदार तरूण-तरूणींशी नमो नवमतदाता संम्मेलनाच्या माध्यमातून जाहीर संवाद साधला. या आभासी संवादाचे आयोजन गोंडपीपरी शहरातील चिंतामणी महाविद्यालयात करण्यात आले होते. यासोबतच याठिकाणी नमो प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले होते; या प्रदर्शनीला उपस्थित नवमतदारांनी भेट देत मोदी सरकारच्या विकासकार्याची माहिती घेतली. त्यानंतर नमो नवमतदाता माय फर्स्ट वोट फॉर मोदी अभियानात सहभागी होत उपलब्ध QR कोड च्या माध्यमातून आपले अभिप्राय नोंदविले. यावेळी बबन निकोडे तालुकाध्यक्ष, साईनाथ मास्टे अध्यक्ष संगानियो,चेतन गौर शहराध्यक्ष,राकेश पुन नगरसेवक,मनीष वासमवार माजी उपसभापती, प्रशांत येल्लेवार, वैभव बोनगीरवार यांचेसह मोठ्या संख्येने नवमतदारांची उपस्थिती होती.

# कंत्राटी कर्मचाऱ्याला वाघाने नेले फरफटत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यात सर्वात जास्त वाघांची संख्या असलेल्या ताडोबा अभयारण्यात 25 जानेवारीला सकाळी एक थरारक घटना घडली, वाघाने सफाई कर्मचाऱ्यांवर हल्ला करीत त्याला पर्यटकांसमोर फरफटत नेत ठार केले. ताडोबा बफर क्षेत्रातील निमढेला गेट वर हा थरार घडला, सकाळी 9 वाजताच्या सुमारास सफाई कर्मचारी 54 वर्षीय रामभाऊ रामचंद्र हनवते यांनी गेट जवळ सफाई केली, त्यांनतर ते गेट जवळील कवठाच्या झाडाजवळ गेले असता त्याठिकाणी दबा धरून बसलेल्या वाघाने पर्यटकांसमोर फरफटत नेत हनवते यांच्यावर हल्ला करीत ठार केले. 5 ते 6 महिन्यांपूर्वी हनवते हे कंत्राटी कर्मचारी म्हणून निमढेला गेटवर रुजू झाले होते, हनवते यांचा मुलगा रणजित हनवते ताडोबा अभयारण्यात गाईड चे काम करतो.













# कांदा पुन्हा रस्त्यावर

आधुनिक केसरी

गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर घसरत आहे. कांद्याच्या दरात मोठी घसरण होत असल्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहे. शेतकऱ्यांनी आंदोलन सुरु केले आहे. निर्यातबंदीच्या निर्णयापूर्वी चार हजारांवर असणारे कांद्याचे दर आता हजाराच्या खाली आले आहे. कांदा निर्यातबंदीनंतर दररोज कांद्याच्या दरात घसरण होत आहे. निर्यातबंदीच्या निर्णयापूर्वी चार हजारांवर असणारे कांद्याचे दर आता हजाराच्या खाली आले आहे. कांदा आता सात महिन्यांनंतर नीच्चांकी दरावर आहे. नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आता हजार ते १२०० रुपयांपर्यंत कांद्याला दर मिळत आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. कांदा पिकातून उत्पादन खर्चही निघत नसल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यामुळे कांद्यावर लादलेली निर्यातबंदी उठवण्याची मागणी केली जात आहे. येवला बाजार समितीत कांद्याच्या भावात मोठी घसरण बघायला मिळत आहे. कांद्याचे सरासरी भाव 900 ते 1000 रुपये प्रति क्विंटलवर आले आहे. गेल्या आठवड्यात 1600 रुपये तर आज सरासरी 800 ते 950 रुपये भाव मिळत असल्याने कांदा तोट्यात विक्री करावा लागत आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कांद्याला जास्तीत जास्त 1065 सरासरी 950 तर कमीत कमी 400 रुपये बाजार भाव मिळाला आहे. कांद्याची आवक वाढल्यामुळे कांद्याचे भाव घसरत असल्याने केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी उठवावी, अशी मागणी देखील कांदा व्यापारी करताना दिसत आहे. सोलापुरात कांद्याचे दर घसरले आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहे. शेतकऱ्यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गेटसमोरच रस्त्यावर कांदा फेकत निषेध केला. तसेच शेतकरी बाजार समितीच्या गेट समोर आंदोलन करत आहे. कांद्याला 1 ते 2 रुपयेपर्यंत भाव मिळत असल्याने शेतकरी संतप्त झाले आहे. बाजारात कांदा विक्रीसाठी आणल्यानंतर कवडीमोल भाव मिळत आहे. कांदा हा नगदी पीक मानला जातो. त्यामुळे मनमाड, मालेगावसह नाशिक जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी कांद्याची लागवड करतात. मात्र यंदा कांदा पट्टा असलेल्या या भागात हरभरा आणि ज्वारीचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला असून हजारो शेतकऱ्यांनी कांद्या अवैजी हरभरा आणि ज्वारीची लागवड केली आहे. कांद्याच्या भावात सतत होणारी घसरण, केंद्र शासनाचा कांद्या बाबत धरसोडीचं धोरण आणि कांदा पीक घेण्यासाठी वाढत चाललेला खर्च आदी कारणामुळे कांदा नगदी पीक असताना त्याला सोडून शेतकरी आता इतर पिकाकडे वळू लागल्याचे चित्र आहे .

# हा देश माझा याचे, भान जरासे राहूद्या रे !

आधुनिक केसरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

**येत्या 26 जानेवारीला 74 वा भारतीय प्रजासत्ताक दिन आपण थाटामाटाने साजरा करीत आहोत,आपल्या देशात सांस्कृतिक विविधता आहे. ती तशीच कायमस्वरूपी टिकवून राहावी, देशातील सर्व लोक सर्वधर्मसमभावाने वागावेत, एकमेकांचे जिव्हाळ्याचे संबंध असावेत, आपण सर्वांनी गुण्यागोविंदांने एकत्रित नांदावे, प्रत्येकाने आपल्या परीने सर्वांना समजून घ्यावे. उच्च- नीचता लहान-मोठा, स्पृश्य- अस्पृश्यता, भेदभाव सोडून द्यावे. सर्व जाती, धर्म. पंथ, संप्रदाय एकत्रित नांदावेत, तेव्हाच आपले प्रजासत्ताक चिरायू होवो, असे आपणास ठामपणे म्हणण्याचा पूर्ण अधिकार प्राप्त होतो.**

क्रांतीकारक सेनापती बापट यांनी लिहिलेले देशभक्तीपर गीत आज जसेच्या तसे आपणास लागू पडते.

15 ऑगस्ट 1947 ला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. आणि 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन उदयास आला या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते, 26 जानेवारी 1950 पासून जनतेच्या हाती कारभार सोपवण्यात आला, भारताची राजधानी नवी दिल्ली येथे संसद भवन उभारण्यात आले, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ कायदेमंडळ , निर्माण करून जनतेच्या हाती सत्ता सोपवण्यात आली ,म्हणूनच या दिनाला प्रजासत्ताक दिन असे म्हटले जाते. तेव्हापासून राज्यघटने नुसार आपल्या देशाचा राज्यकारभार केला जातो, जातीभेद, दहशतवाद,विषमता,दारिद्र्य, भेदाभेद, असहिष्णूता, नक्षलवाद हे विसरून आपण सर्व एक आहोत याची जाणीव ठेवून वागले तरच या देशाचं भान आपल्याला आले असे म्हणता येईल. या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हजारो सैनिकांनी, क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिलेले आहे. त्यांच्या बलिदानाचे आपणाला विस्मरण होता कामा नये. स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून या क्रांतिकारकांनी आपले जीवन संपवले आहे .त्यासाठी आपण सर्वांनी मिळून त्यांच्या स्मृती जागल्या पाहिजेत. तिरंगी झेंड्याचा अभिमान ठेवला पाहिजे, राष्ट्रीय प्रतीके जोपासले पाहिजेत ,परकीय सत्तेने भारतावर आक्रमण केले. डच ,इंग्रज, फ्रेंच ,पोर्तुगीज, मुघल, आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या सर्वांनी भारतावर हल्ले केले तरीही आपल्या इथल्या सैनिकांनी, क्रांतिकारकांनी , शूरावीरांनी छातीचा कोट करून हे हल्ले परतून लावले याचे भान आपल्याला असणे आवश्यक आहे. आज आपण महासत्ता होण्याची स्वप्न पाहत आहोत, आपल्या देशावर आजूबाजूच्या देशांनी हल्ले केले त्यावेळेस ते परतून लावले, यापुढे आपण सर्वांनी एकत्रित पणे सहभागी झाले पाहिजे,तरीही आज देशाला संरक्षणाची गरज आहे ,कसाब सारखे दहशतवादी मुंबईला येऊन पोहोचतात. त्यामुळे आपल्या सुरक्षित तेविषयी शंका निर्माण होते. संसदेमध्ये कामकाज चालू असते वेळेस काही घुसखोर आत शिरतात. याबद्दलही शंका निर्माण होतात. त्यामुळे आपल्या सुरक्षितेविषयी काळजी घेणे गरजेचे आहे. आपला देश महासत्ता होण्यासाठी आपल्या विचारवंतांनी, समाज सुधारकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी , शास्त्रज्ञांनी सर्वांनी जर आपापल्या कामाचे भान ठेवले तर आपण महासत्ता होणारच आहोत. यात तीळ मात्र शंका नाही. आपल्या देशाची लोकसंख्या आज १४० कोटी आहे तरीही ऑलिंपिक सारख्या खेळांमध्ये आपणाला बोटावर मोजण्या इतके पदक मिळतात ही गोष्ट आपल्याला भूषण नाही तर दूषण आहे. याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. आज शेतकऱ्याची अवस्था अतिशय दयनीय व वाईट झालेली आहे, त्याच्या मालाला हमीभाव मिळत नाही ; त्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत हे सत्र थांबले पाहिजे हा देश माझा आहे. मग या देशातील माणसे सुद्धा माझे आहेत, त्यांची जपणूक करणे आपल्या देशाचे कर्तव्य आहे, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान, जय किसान म्हटले आहे, याचे भान असणे महत्त्वाचे आहे, तेव्हा हा देश माझा आहे असे म्हणता येईल ,

आज सर्वत्र बेरोजगारी वाढलेली आहे.काही तरुण हे व्यसनाधीन होत आहेत .जो तो मोबाईलच्या दिवा स्वप्ना मध्ये आपला अमूल्य वेळ वाया घालत आहे ,याचे भान तरुणांने ठेवावे, आज जिकडे तिकडे हिंसाचार वाढत आहे

अपघात दररोज कुठे ना कुठे होत आहेत, त्यामुळे हे थांबविने आज गरजेचे आहे.आज निवडणुकांमुळे लोक आपला, जवळचा ,नातेवाईक म्हणून गैरमार्गाने मतदान करत आहेत, त्यामुळे निवडणुका स्वच्छ वातावरणात घेतल्या जाव्यात, मत विकले जाऊ नये ते स्वाभिमानाने सत्याकडे झुकणारे असावे, मनुष्य हा राष्ट्राची संपत्ती असतो, चांगल्या व्यक्तीला निवडून दिले तर चांगले कार्य होतात .विवेक जाग्यावर ठेवून मतदान करावे लागते, चुकीच्या व्यक्तीला आपला प्रतिनिधी निवडल्या नंतर त्याचे वाईट परिणाम संपूर्ण समाजाला, देशाला भोगावे लागतात. म्हणून भान ठेवून प्रत्येकाने मतदान केले पाहिजे. हा देश माझा आहे या देशातील नैसर्गिक संपत्ती माझी आहे. आपल्याला हे स्वीकारावे लागते, हा उंच हिमालय माझा आहे त्याचं रक्षण करणं आपलं कर्तव्य आहे. आज झाडे तोडले जात आहेत, उजाड माळरान केलं जात आहे, सिंमिटांचे डोंगर उभे करत आहेत.त्यामुळे पाऊस कमी पडतो त्याचे परिणाम सर्व चराचरसृष्टीवर होत आहेत. म्हणून हिमालयाचे रक्षण करणे, आणखी झाडे लावून तो घनदाट जंगल करणे आपल्या सगळ्यांचं कर्तव्य आहे .

या ठिकाणच्या नद्या प्रदूषित होत आहेत. कचरा टाकला जात आहे. मलमूत्र सर्व नदीत सोडून नामा निराळे होत आहेत,जर नद्या प्रदूषित झाल्या तर जलचर प्राणी मरण पावतात. काही जलचरांच्या जाती नामशेष होत आहेत याचे भान आपणाला असावे. नद्या या पवित्र आहेत त्या पवित्र रहावेत म्हणून प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे, सध्या आपण तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वावरत असलो तरी आपले सामाजिक पातळी घसरत आहे अनेक ठिकाणी आई-वडिलांना मुले घराबाहेर काढत आहेत, त्यामुळे वृद्धा आश्रमाची संख्या वाढत आहे. याचा विचार होणं गरजेचे आहे , लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे हा चिंतनाचा विषय झालेला आहे, आपली ही पिढी जर अशी वागत असेल तर आपला भारत देश एवढा महान असून इथली संस्कृती चांगली असून असे का घडत आहे? याची साधक बाधक चर्चा समोर येणं आवश्यक आहे, स्वामी विवेकानंदाकनी भारतीय संस्कृतीचे महत्त्व शिकागोच्या धर्म परिषदेत वर्णन केलेला आहे याचे भान ठेवणे गरजेचे आहे ,माणसं पैशाने मोठी झाली. संपत्ती कमावली पण नैतिकता आणि कर्तव्याला विसरली असे होत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे.आपला देश अर्थव्यवस्थेमध्ये पुढे जात आहे. आपण स्वावलंबी बनत आहोत ,याचा डंका आपण सर्वत्र वाजतगाजत पिटवत आहोत. त्याचबरोबर आपल्या देशावर किती कर्ज आहे? याचा विचार आपल्या मनात येत नाही ते करून पहा मग आपण किती पुढे आहोत? किंवा मागे आहोत ? हे आपोआप कळेल. तसेच आज मुलगाच हवा या अभिलाषे पोटी स्त्री भ्रूण हत्या होत आहेत, त्यामुळे मुलांची संख्या वाढली आहे मुलींची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे गावोगाव शेकडो तरुण लग्नाविना वावरत आहेत



त्यामुळे त्यांच्या कडून गैरमार्ग होण्याची दाट शक्यता आहे ,यामुळे स्त्री -पुरुष समानता आणली पाहिजे.

आज वरवर आपण एक आहोत परंतु प्रत्येक व्यक्तीच्या हातात वेगळा झेंडा आहे, काही व्यक्ती सकाळी, दुपारी, संध्याकाळी तीन झेंडे घेऊन फिरत आहेत, वारंवार पक्ष बदलत आहेत, निष्ठे कमी होत आहे, त्यामुळे शंकेला जागा निर्माण होत आहे ,असे जर होत असेल तर आपण या देशाशी एकरूप होणार नाही, साखरेचा कण जसा दुधाशी एकरूप होतो, तसा मनुष्य राष्ट्राशी एकरूप झाला पाहिजे तेव्हा आपला भारत देश महान होईल असे मला वाटते ,प्रत्यक्ष कृती करूनच मोठे होता येते बोलाचे भात आणि बोलाची कढी म्हणून ढेकर देता येत नाही, असे पूर्वज सांगतात वरील सर्व गोष्टीचे स्मरण करून व प्रत्यक्ष कृती करून आपण वागलो तरच भारत हे प्रजासत्ताक चिरायू होईल म्हणण्याचा आपल्याला सर्व अधिकार आहे, जर आपली लोकशाही आतून पोखरून गेली तर परकीय हल्ले कधीही आपल्यावर होतील हे भविष्य सांगायला ज्योतिषाची गरज आपणास नाही, त्यामुळे आपली शिक्षण व्यवस्था उत्तम दर्जाची असावी, नद्या नाले यांचे साफसफाई केली पाहिजे, झाडे लावले पाहिजेत, पर्यावरणाचे संतुलन ठेवावे लागते तसेच आपला व्यवहार पारदर्शी असला पाहिजे, आपले समाजकारण, राजकारण, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या गोष्टी सर्वांना घेऊन चालणारे असाव्यात, प्रत्येकाला वाटते आपला देश पुढे जावावे, मग कार्य कोण करावं? घरात बसून गप्पा मारून आपणाला सगळं सुरळीत चालवता येणार नाही. प्रत्यक्ष कृतीच करावी लागते ,पोहण्यासाठी पाण्यात उतरावं लागते, अंग न भिजवता पोहता येत नाही, तसं राष्ट्रीय कार्यात सर्वांनी पुढे यावे फक्त 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला आपण भारत माता की जय म्हणतो आणि दुसऱ्या दिवशीपासून आपण विसरून गेल्यासारखे होते,

जरी अनेक आपले धर्म,
जरी अनेक आपल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव आपली
माणुसकीची नाती असे आपणाला घडवायचे आहे असं राष्ट्रीयत्व आपल्याला सांभाळता येईल, म्हणून अनेक विषयावर आज आपण मागे आहोत त्यामुळे भारतीय प्रजासत्ताक दिन अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे या 75 वर्षात आपण केलेल्या सुधारणा आणि आपली झालेली अधोगती या दोन्ही गोष्टी आपल्यासमोर येणे गरजेचे आहे. त्यासाठी आजच्या तरुणांनी आपले नौदल, हवाई दल ,भूदल सुरक्षित राहण्यासाठी त्यात भरती होऊन आपल्या सीमा सुरक्षित ठेवल्या पाहिजेत. आपल्या संस्कृतीला कोणी नाव ठेवेल असे वागू नका, भ्रष्टाचार हा समाजाला लागलेला कलंक आहे, त्यापासून दूर राहा तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने भान ठेवून वागत आहोत काय? म्हणून सेनापती बापट म्हणतात.

हा उंच हिमालय माझा,
हा विशाल सागर माझा,
या गंगा यमुना शेती धरती
बागबगीचा माझा
अभिलाषा याची धरीता,
कोणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया स्फुरण,
आपल्या बाहू पावू द्या रे ...
हा देश माझा याचे,
जरा भान राहू द्या रे..! या ओळी वाचल्यानंतर अंगावर रोमांच उभे राहतात. खरोखर आपण असे वागलो तर आपला प्रजासत्ताक दिन चिरायू होईल असे मला वाटते म्हणून

माझ्या देशवासीयांनो तुम्हाला मला असं सूचित करावं वाटते ,वाढलेली अंधश्रद्धा ,वाईट चालीरीती ,प्रथा, परंपरा ,भ्रष्टाचार ,गैरमार्ग ,अपहरण, दहशतवाद ,नक्षलवाद ,पळवा पळवी, फसवणूक, खोटी आश्वासने, लैंगिक अत्याचार , पैशाचा पाऊस हे सर्व बंद केले तरच आपण जगाच्या स्पर्धेमध्ये टिकू शकाल म्हणून हे गीत तुमच्यासमोर स्फूर्तीसाठी ठेवत आहे.

हे बंद करा उत्पात,
थांबवा हा आपुला घात
संघर्ष न जावो व्यर्थ
काहीसा अर्थही येऊ द्या रे...!

सर्वांनी आपण एकत्रित येऊन आपल्या देशाची सेवा करावी, या ठिकाणी महिलांना समानतेची व सन्मानाची वागणूक द्यावी,अनाथ मुले मुली, विधवा महिला या सर्वांना न्याय देऊन समानतेने घेऊन चाललो तरच आपले भान जाग्यावर आहे असे म्हणता येईल आणि देशाचा सन्मान होईल, भारतातील भिन्न भिन्न प्रदेशातील अनेक संत, महंत, महात्मे, थोरपुरुष, क्रांतिकारक , सैनिक, शेतकरी, प्राकमी महिला पुरुष, समाजसुधारक ,विचारवंत, शास्त्रज्ञ,महान व्यक्ती या सर्वांनी देशासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करू, भारतातील अनेक गट जाती समूह ,आदिम जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती ,बारा बलुतेदार , अठरा अलुतेदार यांच्यातील समन्वय, सामंजस्य, एकात्मता, यांच्या प्रथा, परंपरा ,पोशाख, भाषा ,आचार- विचार, देवदेवता ,उत्सव ,उपासना पद्धती, नृत्य विविधतेतून एकात्मता सर्व जतन करून हा आपला देश आहे याचे जरासे भान राहू द्या रे.....!असे म्हणून विविधतेत एकता दाखवून देऊ, व आपला देश प्रगतीपथाकडे नेण्याचा सर्वांनी प्रयत्न करू. **(लेखक हे इतिहास विषयाचे तज्ज्ञ आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पोलिसाची गळफास घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**फर्दापूर :** येथील पोलिस ठाण्यात असलेल्या ३२ वर्षीय पोलिस कर्मचाऱ्याने घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास उघडकीस आली. सतिष नारायण हिवाळे वय ३२ रा. उंडणगांव ता. सिल्लोड हमु. फर्दापूर असे मृत पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही.याविषयी माहिती अशी की, सतीश हिवाळे बक्कल नंबर ६७३ हे सन २०१६ च्या बॅचचे पोलिस कर्मचारी असून मागील दोन वर्षापासून ते फर्दापूर पोलिस ठाण्यात कार्यरत होते. तेव्हापासून येथील पोलिस वसाहतीतील तिसऱ्या मजल्यावरील शासकीय निवास्थानात ते पत्नी व दोन वर्षीय मुली सोबत रहात होते. बुधवारी सकाळी ११:३० वाजेपर्यंत त्यांनी फर्दापूर पोलिस ठाण्यात नेहमीप्रमाणे कर्तव्य बजावले त्यानंतर ते घरी गेले. दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्यांची पत्नी लहान मुलीला खेळण्यासाठी बाहेर घेऊन गेलेली असतांना सतीश हिवाळे यांनी घरात मुलीसाठी बांधलेल्या झोक्याच्या दोरीला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांची पत्नी घरी परतल्या नंतर त्यांनी हे दृष्य बघून आरडाओरडा केल्याने ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरिक्षक सुग्रीव चाटे, सा. फौ राजेंद्र साळवी, पो.कॉ योगेश कोळी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन हिवाळे यांना वैद्यकीय उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून हिवाळे यांना मृत घोषित केले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे यांनी घटनास्थळी भेट दिली.

# शेतकरी दुष्काळी मदतीच्या प्रतीक्षेत

## कोरडा दुष्काळ कागदावरच : पीक विम्याचेही भिजत घोंगडे कायम

आधुनिक केसरी न्यूज


**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** यावर्षी खरिप हंगामाच्या सुरुवातीपासूनच पावसाने हुलकावणी दिली आहे. जून महिना कोरडा गेल्यामुळे मुळातच पेरण्या उशीरा झाल्या होत्या. त्यातच पावसाने २० ते २५ दिवसाची ओढ दिल्यामुळे अनेक भागातील पिके करपून गेली होती. परिणामी अखेर शासनाकडून सर्व्हे करुन परिस्थीती नुसार दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. तद्वतच शेतकऱ्यांनी भरलेल्या पीक विम्याची अग्रीम रक्कम मंजूर करण्यात आली होती. परंतू सदर रक्कम अद्यापही बऱ्याच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही.तर जाहीर केलेला दुष्काळ कागदावरच असून, सदर दुष्काळी मदतीची अपेक्षा शेतकऱ्यांना लागली आहे. आथिर्क अडचणीमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. मात्र याबाबत लोकप्रतिनिधी सुस्त असल्याने शेतकऱ्याकडून प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात खरिपाची पेरणी सुरु झाल्यामुळे सोयाबीन सारख्या हमी पिकाचे उत्पादन घटणार हे पेरणी अगोदरच निश्चित झाले होते. परंतू सोयाबीन शिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळे शेतकऱ्यांचा नाविलाज झाला होता. अखेर उशीरा का होईना पण शेतकर्यांनी पेरणी उरकून घेतली होती. आणि जेमतेम रिमझिम पडणाऱ्या पावसाच्या जोरावर कसेबसे शेतशिवार हिरवे झाले होते. आगस्ट महिन्यात झालेल्या तुरळक अल्पवृष्टिमुळे खरिप पीके तग धरून उभी होती. मात्र ऐन फुलं आणि शेंगा पक्व होणाच्या अवस्थेत पावसाने सलग २० ते २५ दिवसाची प्रदीर्घ विश्रांती घेतली होती. पाऊस नसल्यामुळे बऱ्याच भागातील शेतकऱ्यांची पिके करपून गेली होती. परिणामी



शेतकऱ्यांकडून दुष्काळ जाहीर करावा अशी ओरड सुरू झाली होती.त्या अनुषंगाने अनेक शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधी रस्तावर सुद्धा उतरले होते. दुष्काळ सदृश परिस्थिती लक्षात घेऊन महसूल प्रशासनाकडून पंचनामे सुद्धा कारण्यात आले आहेत. अनावधानाने काही कृषी मंडळांना दुष्काळी यादीतून वगळण्यात आले असल्याचे सुद्धा माध्यमांनी अधोरेखित केले होते. हा सर्व खटाटोप सर्वश्रुत आहेच. दुष्काळ जाहीर केला ह केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे; तर शासन,प्रशासन,सरकार आणि संबंधीत लोकप्रतिनिधींना सुद्धा माहिती आहे. मात्र सदर दुष्काळ अद्यापही कागदावरच असून, शेतकरी दुष्काळी मदत मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. एरवी परिस्थिती पाहून शेतकऱ्यांचा पुळका आणणारे खुप आहेत. मात्र सध्यस्थितीत खरिप हंगाम संपूर्णतः हातचा गेलेले शेतकरी आथिर्क संकटात सापडले आहेत. निसर्गाच्या लहरपणामुळे रब्बीची शाश्वती नाही. त्यामुळे शेतकरी आणखीनच हतबल झाले आहेत. अशा बिकट स्थितीत शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळावी अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करित आहेत. या बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासन दरबारी पोटतिडकीने पाठपुरावा करावा असे सुद्धा शेतकरी बोलत आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची अग्रीम रक्कम अद्यापही जमा अशा शेतकऱ्यांकडून प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे. या गंभीर विषयावर शेतकऱ्यांचा पुळका आणणाऱ्यांनी पुढे यावे असे अपरोधाने शेतकरी बोलत आहेत.



पीक विम्याची २५ टक्के रक्कम खुप तुटपुंजी आहे . यात मजुरीचा खर्च पण भरून निघत नाही . आभाळाला भिडलेले रासायनिक खतांचे भाव आणि महागडी कीटकनाशके फवारून सुद्धा सोयाबीन एकरी तीन चार पोते झाली आहे . यापेक्षा मोठा दुष्काळ काय पाहिजे ? त्यातच सोयाबीनला फक्त चार ते साडेचार हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे . अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगावं की मरावं . . !

**प्रवीण बोडखे, ( शेतकरी, लोणी बु . ता . रिसोड )**

परतीच्या पावसाची हुलकावणी आणि अवकाळीचा तडाखा

पावसाळ्याच्या शेवटी हमखास पडणाऱ्या परतीच्या पावसाने हुलकावणी दिली आहे . त्यामुळे शेतकऱ्यांचे यावर्षीचे संपूर्ण गणित चुकले आहे . कारण परतीच्या पावसावरच रब्बी हंगामातील गणित जुळवल्या जात असल्याचे अनुभवी शेतकरी बोलतात . मात्र परतीचा पाऊस तर पडलाच नाही,पण वातावरणाच्या भरवशावर तूर,गहू, हरभरा या पिकांनी जो बहर धरला होता तो अवकाळी पावसाने उध्वस्त करुन टाकला आहे . बेमौसमी अवकाळी पावसाच्या तडाख्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे . सध्यस्थितीत अधून मधून निर्माण होणारे ढगाळ वातावरण शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे . त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांना सरकारचा मदतीचा हात मिळणे खुप गरजेचे आहे .



# आगीत मोटारसायकल, शेडसह पाच लाखांचे शेती उपयोगी साहित्य जळून खाक

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** निफाड तालुक्यातील सोनेवाडी बु.येथील निलेश विश्वनाथ निफाडे यांचे शेडला आग लागून सुमारे पाच लाख रुपयांचे मोटारसायकल, शेडसह शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले तर गाय भाजली असल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सोनेवाडी बु.शिवारातील गट नं.१४३/२ मधील निलेश निफाडे यांचे राहत्या घराजवळील शेडला परवा रात्री १२ वाजता अचानक आग लागली. निफाडे कुटुंबीयांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना यश आले नाही. या आगीत शेड, मोटारसायकल, १५० कॅरेट, पिस्टनपंप, शिकरपंप, ताडपत्री, द्राक्षे बागेची औषधे, खते, धान्य, भुईमूग शेंगा, बांबू, दरवाजे, पीव्हीसी पाईप, जनावरांचे खाद्य, द्राक्षे बागेसाठी वापरात येणारे साहित्य, दोन सायकल, इत्यादी साहित्य जळून खाक झाले आहे. त्याचबरोबर जर्शी जातीची गाय भाजली आहे. आगीचे कारण कळले नसून याबाबत तलाठी शंकर खडांगळे यांनी पंचनामा करून तहसीलदार निफाड यांना अहवाल सादर केला आहे.

# अनेक ठिकाणी निकृष्ट नमकीन विक्रीला

## पाकिटात निघाली अळी : नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी किराणा व्यवसायिक आहेत काही किराणा दुकानांमध्ये नवीन सामान तथा वस्तू या विक्रीला असतात तर अनेक किराणा दुकानांमध्ये जुनेच सामान उदाहरणार्थ बिस्कीट नमकिन विविध पाकिट तेल खवा,इतर मसाले असेल इतर साधने असेल साबन असेल याकडे अन्न व औषध प्रशासन विभाग मात्र जाणून-बुजून हप्ते घेऊन दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. दिनांक २५ जानेवारी रोजी एका किराणा दुकानातून गोपाल कंपनीचे नमकीन गाठीया शेव चे पाकीट एका व्यक्तीने घेतली असता व ते पाकीट फोडले असता त्यातून अळी बाहेर निघाली असल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना मेलद्वारे सॅम्पल पाठवली आहे. यावरून किती निकृष्ट दर्जाचे अनेक वर्षापासून कितपत पडलेले सामान किराणा व्यवसायिक हे विक्रीसाठी उपलब्ध करून ठेवत असतात,






त्यामुळे दर महिन्याला तपासणी करून नवीन मालक दुकानात ठेवण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी ग्राहकामधून व्यक्त होत आहे.सर्रास नागरिकांच्या लहान मुलांच्या आरोग्याची हा खेळ सुरू असून याकडे अन्न व औषध प्रशासन विभाग दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. अन्न व औषध प्रशासन विभाग फक्त दिवाळीला वसुली करण्याकरताच रस्त्यावर उतरते की काय ? असा सवाल सुद्धा उपस्थित होत आहे. ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या माध्यमातून एकीकडे ग्राहकांना जागृत करण्याचे काम सुरू असताना दुसरीकडे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या दुर्लक्षतेपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे, त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने संपूर्ण जिल्ह्यामध्ये तपासणी मोहीम राबवावी असे मागणी होत आहे .

# धुळ्यात उद्या काँग्रेसची उत्तर महाराष्ट्र विभाग जिल्हानिहाय आढावा बैठक

## आ. कुणाल पाटील यांची पत्रपरिषदेत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उत्तर महाराष्ट्र विभाग जिल्हानिहाय आढावा बैठक शनिवार दि. २७ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान साईलक्ष्मी लॉन्स अँड रिसॉर्ट, द्वारकामाई बँक्वेट हॉल, गेट नं. ४, गोंदूर तलावाजवळ, गोंदूर येथे घेण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष तथा धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील यांनी गुरुवार दिनांक २५ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली, याप्रसंगी धुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शामकांत सनेर, धुळे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. अनिल भामरे, धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष बाजीराव पाटील, डॉ. दरबारसिंग गिरासे, पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

नासिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार आणि जळगाव या पाचही जिल्ह्यांचा जिल्हानिहाय आढावा घेतला जाईल. विभागातील प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. पक्षातील ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, अशोकरावजी चव्हाण, विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील या मान्यवरांसह सर्व प्रदेश उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस आणि अहमदनगर, नासिक, धुळे, नंदुरबार, जळगाव जिल्ह्यातील एक हजारांहून अधिक कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी होणार आहेत. या बैठकीत राज्याचे प्रभारी चेन्नीथला हे पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी चर्चा करतील. बूथ कमिट्या, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची लोकसभा निवडणुकीच्या



दृष्टीने तयारी, संघटनात्मक बांधणी अशा विषयांवर बैठकीत चर्चा होईल.

सकाळी १० ते दुपारी १ या पहिल्या सत्रात जिल्हाध्यक्ष शहर, ग्रामीण, जिल्हा प्रभारी, सहप्रभारी, आमदार, माजी खासदार, माजी आमदार, जिल्ह्यातील प्रदेश पदाधिकारी, प्रदेश प्रतिनिधी, जिल्ह्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सदस्य, जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, जिल्हा परिषदेचे आजी माजी पदाधिकारी, माजी महापौर, उपमहापौर, नगर परिषद, नगर पालिकेचे माजी पदाधिकारी, जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील प्रमुख नेते, जिल्ह्यातील ब्लॉक/तालुका अध्यक्ष, जिल्ह्यातील आघाडी संघटना अध्यक्ष, जिल्ह्यातील विभाग व सेलचे जिल्हा प्रमुख यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

दुपारी अडीच ते साडेपाच वाजेदरम्यानच्या दुसऱ्या सत्रात जिल्हा ग्रामीण, शहर काँग्रेस कमिटीची कार्यकारिणी, जिल्ह्यातील ब्लॉक, तालुका काँग्रेस कमिटीची कार्यकारिणी, महानगरपालिका, नगर परिषद, नगर पालिका, नगर पंचायत, आजी- माजी नगरसेवक, जिल्हा मध्यवर्ती बँक, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी-विक्री संघ, दूध संघ, साखर कारखाना, सूत गिरणी या संस्थांचे आजी माजी संचालक, जिल्ह्यातील आघाडी, विभाग, सेलची कार्यकारिणी, जिल्ह्यातील मंडळ, प्रभाग अध्यक्ष यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या विभागीय बैठकीत नासिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यातील मंडल कमिट्या, बूथ कमिट्या, बूथ लेव्हल एजंट (बी एल ए) संदर्भात आढावा घेण्यात येणार असून उदयपूर (राजस्थान) चिंतन शिबिरातील निर्णयांच्या संदर्भात, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सद्याच्या राजकिय परिस्थितीवर चर्चा केली जाणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील सर्व शहर आणि ग्रामीण जिल्ह्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यात सकाळी १० ते दुपारी १२ वाजेदरम्यान धुळे शहर व ग्रामीण, नंदुरबार, जळगाव शहर व ग्रामीण, अहमदनगर शहर व ग्रामीण, नासिक शहर, ग्रामीण व मालेगाव शहर जिल्हानिहाय बैठका घेण्यात येतील.

# भारतीय संविधान- प्रास्ताविका, स्वरूप आणि उद्देश



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**भारतीय संविधान म्हणजे भारत देशाचा सर्वोच्च कायदा, सार्वभौम असणाऱ्या देशांपैकी सर्वात मोठा लिखित दस्तऐवज. ज्यामध्ये राज्यांचे सिद्धांत, सरकारचे कर्तव्य, अधिकार, नियम तथा चौकट परिभाषित केलेली आहे. राज्य म्हणजे काय? तर अनुच्छेद १२ प्रमाणे केंद्र सरकारसह प्रत्येक राज्यांचे सरकार व त्यांच्या नियंत्रणातील स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणे. भारतीय संविधान सभेची प्रथम बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान लिहून पूर्ण होऊन ते स्वीकृत म्हणजे लोकांनी स्वतः प्रत अर्पण केले. असा २ वर्ष ११ महिने १७ दिवसांचा ऐतिहासिक पल्ला ओलांडून २६ जानेवारी १९३० रोजीच्या संपूर्ण स्वतंत्रता दिवसाची आठवण म्हणून २६ जानेवारी १९५० या दिवशी त्याची सार्वभौमता विधीलिखित व अधिनियम करण्यात आली.**

तत्पूर्वी २५ जानेवारी १९५० रोजी संविधानाच्या इंग्रजी व मराठी भाषेतील तीन प्रती (दोन हस्तलिखित व एक छापील) संविधान सभेच्या पटलावर ठेवण्यात येऊन त्या २८४ सदस्यांनी स्वसाक्षांकित केल्या. १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारतीयांच्या अख्त्यारित नसल्यामुळे मागील १५० वर्षातील कोणत्याही स्मृती जपता आल्या नाही. परंतु गणराज्य दिन हा लोकशाहीचे अत्युच्च उदाहरण ठरवून त्यामधून खरी सार्वभौमता प्रगट होण्यासाठी २६ जानेवारी या दिवसाची निवड करण्यात आली.

**प्रास्ताविका :** कोणत्याही पुस्तकाचे प्रतिबिंब प्रस्तावनेमध्ये स्पष्ट दिसते. त्याच तत्त्वाप्रमाणे संविधानाची प्रस्ताविका ही संविधानाचा सारांश ठरते. १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरू यांनी ध्येय उद्दिष्टांचा ठराव संविधान सभेसमोर मांडला. त्या प्रस्तावावरील खडाजंगी चर्चेअंती २२ जानेवारी १९४७ रोजी भारतीय संविधानाची प्रास्ताविका आकारास आली.


प्रास्ताविकेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे भारतीय जनता हीच संविधानाचे उगमस्थान आहे. 'आम्ही भारताचे लोक ' या वाक्याने संविधानाच्या प्रस्ताविकेची सुरुवात झालेली आहे. सुरुवात कशी करावी? याबद्दल संविधान सभेच्या सदस्यांमध्ये एकमत नव्हते. मौलाना हजरत मोहली यांच्या मते 'अल्लाह' च्या नावाने सुरुवात करावी. मदन मोहन मालवीय यांच्या सूचनेनुसार 'ओम नमः शिवाय' हे असावे. तर एच. पी. कामत यांनी 'ईश्वराला' प्राधान्यक्रम देण्याचे सुचविले. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, संविधानाच्या माध्यमातून ज्या लोकांचे हित साधायचे आहे. ज्यांचे कल्याण करायचे आहे. ज्या लोकांनी लोकांकडून लोकांसाठी हा लोकशाहीचा डोलारा उभा करायचा आहे. त्यांच्याच नावाने म्हणजे 'लोकांच्या' नावाने सुरुवात करावी असे सुचवले. वादसंवादांती विषय मतदानास टाकला गेला. ५९ टक्के मताधिक्क्याने लोकांचा विजय होऊन इतरांचा पराजय झाला.

**स्वरूप :** संविधानाचे स्वरूप हे सा, स, ध, लो, ग या पाच अक्षरांनी प्रकट होते. सा-सार्वभौम म्हणजे भारत ही एक निरंकुश सत्ता असेल. त्यावर कोणत्याही बाह्य शक्तिचा अंकुश नसून, आपले सर्व अंतरबाह्य निर्णय घेण्यास देश सक्षम, समर्थ आणि स्वतंत्र असेल. आम्हीच आमची सर्वोच्च सत्ता आहोत.

स-समाजवादी हा शब्द १९७६ साली ४२ व्या संशोधनाने अंतर्भूत केला असला, तरी त्यामधून समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता या मानवी मूल्यांना जोपासणाऱ्या विचारसरणीचे प्रवर्धन होताना दिसते.

ध-धर्मनिरपेक्ष म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद २५ ते २८ नुसार भारतीयांना धर्म स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. कोणी कोणत्याही धर्माची उपासना, जोपासना, प्रगटीकरण करावे. कोणत्याही धर्माप्रती श्रद्धा बाळगण्यास कोणालाही प्रतिबंध केला जाणार नाही. परंतु हे सर्व वैयक्तिक स्तरावर करणे बंधनकारक असेल. राज्यांचा असा कोणताही एक धर्म असणार नाही. लो-लोकशाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अब्राहम लिंकन पेक्षा लोकशाहीची वेगळी व्याख्या केलेली आहे. लोकांच्या सामाजिक, आर्थिक तथा राजनैतिक जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणणारी रक्तविहीन क्रांतिकारी शासन प्रणाली म्हणजे लोकशाही. ग-गणराज्य, गण म्हणजे लोक किंवा प्रजा आणि त्यांचे राज्य. याचा अर्थ जनताच देशाची मालक आहे. म्हणून लोकशाही शासन प्रणाली मधील कोणतेही पद हे वंशानुगत तथा वारसाहक्काने मिळत नसून मतपेटीतून बहुमताने निवडले जाते.

**उद्देश :** अडीच हजार वर्षांपूर्वी तथागत गौतम बुद्धाने अखिल विश्वाला न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता ही महान मानवी मूल्य प्रदान केलेली आहेत. त्याच मानवी मूल्यधारीत भारतीय समाज व्यवस्था निर्माण करण्याचा भारतीय




संविधानाचा उद्देश आहे. संविधानाच्या २२ भागांमधील ३९५ कलमे व १२ परिशिष्टांमध्ये या मूल्यांचा कुठेही नामोल्लेख नसला तरी, ते सर्व त्यांच्या परिघातच सामावलेली आहेत.

प्रास्ताविकेमध्ये न्याय कसा असावा? याचा क्रम सांगितलेला आहे. सामाजिक, आर्थिक आणि नंतर राजनैतिक. त्यामुळे सर्वप्रथम सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतीय नागरिकात जात, धर्म, लिंग यावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. तसेच ८५ टक्के बहुजनांसाठी प्रतिनिधित्वाची व्यवस्था केलेली आहे.

स्वातंत्र्याच्या परिघात अनुच्छेद १९ मध्ये सहा प्रकारच्या स्वातंत्र्यासह प्रत्येक नागरिकास आपले मत प्रदर्शित करणे, विचार व्यक्त करणे, सोबतच विश्वास, श्रद्धा व उपासना यांचाही समावेश आहे. तसेच स्वातंत्र्याचा स्वराचार होणार नाही याचीही काळजी संविधानाच घेताना दिसते.

समानता या मूल्याला खूप मोठी व्यापकता आहे. कित्येक वर्षापासून शोषित असलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दर्जाची व संधीची समानता उपलब्ध करून, कायद्यासमोर सर्व समान असले तरी, समतेसाठी समानता या तत्त्वानुसार आरक्षणाची व्यवस्था निर्माण केलेली आहे.

बंधुता ही ४२ व्या घटनादुरुस्तीने अंतर्भूत केलेली असली तरी, देशातील बहुआयामी संस्कृतीच्या लोकांना राष्ट्राची एकता, एकात्मता तथा एकसंघ राष्ट्र निर्मितीसाठी ती आश्वस्थ करणारी आहे. तिच्यामुळेच समाजातील सामाजिक असमानता, जातीय विषमता, अस्पृश्यता, गरिबी व भेदभाव दूर होण्यास मदत होते.

भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेला अपेक्षित समाज निर्मितीसाठी संपूर्ण संविधान जबाबदार आहे. परंतु संविधान हे साध्य नसून साधन आहे. ते ज्यांच्या हातात असेल त्यांचे चरित्र तथा चारित्र्यानुसार त्याचा वापर केला जातो. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे २५ नोव्हेंबर १९४९ रोजीचे संविधान सभेतील अंतिम भाषण अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामध्ये ते संविधानातची अंमलबजावणी करणाऱ्या प्रामाणिक तथा अप्रामाणिक हातांचा उल्लेख करतात. सामाजिक समता निर्माण झाली नाही तर संविधान लोकांना कुचकामी वाटेल. लोकशाहीमध्ये व्यक्तिवाद जोपासू नये. कोणी कितीही मोठा असला तरी त्याच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये. असे झाल्यास तो सार्वजनिक संस्था उध्वस्त करू शकतो. महत्प्रयासाने मिळवलेले स्वातंत्र्य एकदा गमावले तर पुन्हा मिळवता येणार नाही. इत्यादींसह अनेक धोके त्यांनी बोलून दाखविले आहेत.

आज घडीला त्याची प्रचिती येताना दिसते की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. धर्मनिरपेक्षता या तत्त्वाला हरताळ फासून धर्माच्या कामी शासकीय आदेश पारित होताना दिसत आहेत. उच्चजातीय लोकांचे लांगुलचालन करण्यासाठी बलात्कार करणाऱ्यांची शिक्षा माफ केली जात आहे. बलात्कारी बुवा, बापू, बाबांना पॅरोलवर सोडण्यात येत आहे. लॅटरल एन्ट्रीमार्फत स्वजातीयांना उच्चपदस्त अधिकार बहाल केले जात आहेत. काही सरकारी शाळांना बंद करून उर्वरित भांडवलदारांच्या घशात घालण्याचा डाव रचला जात आहे. कंत्राटीकरण आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून बड्या मालदारांना आणखी मालेमाल करण्याचे मनसुबे आकार घेताना दिसत आहेत. ज्यामुळे प्रचलित कामगार कायदे संपुष्टात येऊन बहुजनांचे ( एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी) आरक्षण सांगतेकडे वाटचाल करत आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीमध्ये सर्वोच्च स्थानी असणाऱ्या लोकांचे महत्त्व शुन्यत्वाची पातळी गाठत आहे. याची कारणमीमांसा करताना काही लोक म्हणतात, की याला धर्म नावाची अफूची गोळी जबाबदार आहे, तर काहींच्या मते वोटिंग मशीन!

आज अमृत महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या प्रजासत्ताक लोकशाहीमध्ये लोकांच्या हक्क-अधिकारांच्या चर्वण-चर्चेसह वैचारिक जागृती होऊन संविधानाचा सन्मान, सुरक्षा तथा संवर्धन अपेक्षित आहे. अन्यथा कोणतेही आढेवेढे न घेता मनुस्मृतीला सामोरे जाण्यासाठी तयार असावे!.....



# खडकी सदार येथे माकडाचा हैदोस; पत्र्यांचे नुकसान

## गावकऱ्याकडून माकडांचा बंदोबस्त करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**


**रिसोड :** गेल्या काही दिवसांपासून खडकी सदार परिसरात माकडांच्या टोळीने हैदोस घातला आहे.

सदर माकडे मालमत्तेचे नुकसान करण्याबरोबरच लहान मुले व नागरिकांच्या अंगावर धावून जात असल्याने त्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्याकडून करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसापासून खडकी सदार येथे माकडाने मोठ्या प्रमाणात हैदोष घातला आहे. यामुळे गावातील अनेक घरावरचे पत्रे तसेच पाईप यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. गावामध्ये सध्या महिला लहान मुले यांच्यामध्ये भिंतीचे वातावरण आहे. रस्त्याने चालत असताना कधी माकड या पत्रा वरुन दुसरीकडे उडी घेईल हे सांगता येत नसेल्याने, जाणाऱ्या येणाऱ्याला आपला जिव मुठीत घेऊन रस्त्याने रहदारी करावी लागत आहे.

माकडाचा हैदोसामुळे गावात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महिलांनी पत्र्यावर घरातील काही वस्तू वाळू घालण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत. मात्र माकडकडे हातात घेऊन पळ काढत आहेत. महिलांनी त्यांना आडवण्याचा पर्यंन केला तर ते महिलांच्या अंगावर धावत येत आहे. त्यामुळे गावात माकडापासून जिवीत हानी होण्याची शक्यता आहे. माकडांचा ग्रामपंचातने लवकरात लवकर बंदोबस्त करावा अशी मागणी गावकऱ्याच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच अजून उन्हाळाचे दिवस येण्याचे बाकी आहे, मात्र त्याआधीच माकडाने गावात धुमाकुळ घातला आहे.



सध्या गावात माकडांने मोठ्या प्रमाणात हौदोस घातला आहे . गावातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भितींचे वातावरण आहे . तसेच गावात सर्वांत जास्त पत्र्याचे घरे असल्याने माकडे उड्या मारत गावभर फिरत असल्याने दगड अंगावर पडण्याची भिती निर्माण झाली . **दिपक अर्जुना सदार**



माकडामुळे गावात मोठे नुकसान होत आहे . माझ्या घरा समोर माझी विस्टा चालकी गाडी उभी होती . मात्र माकडाने पत्रावर पळत असताना गाडीवर उडी मारत मोठ्या प्रमाणात गाडीचे नुकसान केले आहे . तसेच गाडी जवळ कोणी उभे नसल्याने थोड्यात जिवीत हानी होण्यापासून टळले आहे . मात्र या वानराचा लवकरात लवकर बंदबस्त करण्यात यावा .

**गजानन सुभाष सदार**

# भोकर महसूल विभागाचे वाळू तस्करांना अभय..!

## रात्रीला ट्रक वाहतूक : लाखांचा महसूल पाण्यात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात कुठेच वाळू घाट नसला तरी अनेक हायवा ट्रक मधून हजोरोब्रास वाळू पूरवठा केला जात आहे.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी येथील महसूल विभागाने "पथकाची" नियुक्ती केली आहे. पथकाच्या नाकावर टिच्चून रात्रीला वाळुची सर्रास वाहतूक सूरू आहे. येथील महसूल विभागाची छूपी संमती असल्याने शहरात तस्करांनी धुमाकूळ घातला आहे.वरिष्ठानी याकडे लक्ष देवून तस्करांना जेरबंद करण्यात यावे अशी राजेश चद्रें यांनी मागणी केली आहे.

#तालुक्यात मोठी नदी नसल्याने वाळू घाट नाही.लगत असलेल्या ऊमरी,मूदखेड,बारड, तालुक्यातील घाटावरुन चोरी छुपे वाळु तस्कर रात्रीच्या सुमारास हायवा ट्रक मधून हजारो ब्रास वाळूची वाहतूक करीत आहेत.येथील महसूल विभागाने तस्करांना आळा घालण्यासाठी एका पथकाची नियुक्ती केली आहे. सदरील पथक नावालाच असुन आजपर्यंत कुठलीच ठोस कार्यवाही केली नाही. तक्रारी वाढल्याने केवळ उद्दिष्टपूर्ती म्हणून कागदी घोडे नाचविले जातात. तहसीलच्या प्रांगणात पकडून आणलेला ट्रक कार्यवाही न करताच सोडून दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वाळू वाहतूकीचा परवाना नसताना शहरात वाळुचा पुरवठा केला जातो आहे. ट्रकला नंबर प्लेट न लावता हा गैरप्रकार सूरू आहे.तस्कर आणि महसूल अधिकारी यांच्यात "साटेलोटे" असल्याने हा प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे.याशिवाय गौण खनिज मोठ्या प्रमाणात खोदकाम करून आणला जात आहे. परिणामी निसर्गाचे संतुलन बिघडते आहे.शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बूडतो आहे.जड वाहतुकीमुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. रात्रीअपरात्री भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रकला अपघात होण्याची शक्यता आहे.मागील आठवड्यात भोसी,खरबी रस्त्यावर अपघातात एका युवकाला जीव गमवावा लागला. वाळू तस्करांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी येथील सामाजिक कार्यकर्ते राजेश चंद्रे यांनी गुरुवारी(ता.२५) तहसील कार्यालयासमोर उपोषणास प्रारंभ केला आहे. वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.



# पांढऱ्या सोन्याची हेळसांड; शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** कापसाला चांगले दर मिळतील या आशेने बोरीसह जिंतूर तालुक्यातील कापुंस उत्पादक शेतकयांनी गेल्या वर्षीच्या तुलनेने यंदा कपाशीच्या लागवड क्षेत्रात वाढ केली. मात्र, नैसर्गिक संकटे अन् शेतमालाला मिळत असलेल्या भावामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली असल्याची स्थिती जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये दिसून येत आहे. रेनटचच्या नावाखाली कवडीमोल दराने कापूस खरेदी होत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. यंदा निसर्गाच्या लहरीपणाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. सुरुवातीला सोयाबीन पिकाचे नुकसान केले. त्यानंतर शेतकऱ्यांची कापसावर मदार होती. अत्यल्प पावसामुळे तेही निम्म्यावर आले. शेतशिवारात वेचणीसाठी आलेला कापूस अवकाळी पावसाने भिजला. आधीच निसर्गाचे संकट कमी होते की काय त्यात भर म्हणून आता कवडीमोल भाव मिळत आहे. शेती मशागतीपासून ते काढणी अन् बाजारात शेतमाल विक्रीसाठी घेऊन येण्यापर्यंतच्या खर्चाचा विचार केल्यास मिळत असलेल्या भावामुळे हाती काहीच उरेनासे झाल्याचे शेतकऱ्यांमधून भावना वक्त होत आहेत. यातही बाजारात त्या रेनटच कापसाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळेना. रबी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा व तुरीला आदी पिकांना अवकाळी व धुक्याने फटका बसल्याची स्थिती असून, शासनाने शेतमाल दरवाढीसाठी प्रयत्न करावे, अशी मागणी होत आहे.



**घरात कापूस सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे :** शार्टसर्किट, गॅस लिकेज किंवा चुलीमधील विस्तवामुळे आग लागण्याची भीती असते. अनेक शेतकऱ्यांकडे कापूस साठवणुकीसाठी गोदाम नसल्याने ते घरातच कापूस ठेवतात. त्यातच गावामध्ये आग नियंत्रणासाठी साधने उपलब्ध होत नसतात. त्यामुळे अधिक काळ घरात कापूस ठेवणे धोकादायक झाले आहे.

**खर्च दुप्पट मात्र उत्पन्न कमी :** दिवसेंदिवस शेती व्यवसाय तोट्याचाच ठरत असल्याचे दिसून येते. कोणतेही उत्पादन घेणे आवाक्याबाहेरचे झाले आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी शासन प्रयत्न करीत असले तरी वास्तावात मात्र, शेतमालाच्या भाववाढीची स्थिती उत्पन्नापेक्षा खर्चच अधिक असल्याची आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करावी. तर कशी असा सवाल उपस्थित होत आहे. एकीकडे औषधी, स्वते, बी–बियाणांच्या किमतीत दरवर्षी काहीना काही वाढ होते. मात्र, शेतमालाच्या बाबतीत शासन विचार कधी करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## बोडखा येथे श्रीराम मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील बोडखा येथे श्री क्षेत्र अयोध्या नगरीमध्ये श्री राम मंदिर मूर्ति प्राणप्रतिष्ठा व संपूर्ण भारतातील आनंद मोहत्सावच्या निमित्ताने बोडखा येथे संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने गावामध्ये दिंडी व कलश यात्रा तसेच गुढ्या उभारुण आनंदाचा मोहत्सव साजरा केला. यावेळी श्री विट्ठल भजनी मंडल जय मल्हार भजनी मंडळ राजे शिव छत्रपती गणेश मित्र मंडळ उपस्तिथि होते. व या सर्वांच्या उपस्थितिमध्ये रात्री ८:३० ते १०:३० या वेळेत श्री राम चरित्रावर त्यांच्या जीवनातील आदर्श घ्यावा म्हणून ह.भ.प. श्री संदीप महाराज जाधव (बोडखेकर मो. ९८७००४८०१५) यांची हरीकीर्तन सेवा झाली. त्यावेळी गावातील मा.रायभान पाटील सोनवाने (विद्यमान पोलिस पाटील), बालकृष्ण महाराज लोंढे, मा. एकनाथ पाटील जाधव, सर्जेराव पाटील लोंढे, फकीराराव महाराज लोंढे, गुलाबराव नाके पाटील, किसन महाराज जाधव, मा. रतन बनसोड (साउंड सिस्टम) यांनी हरी कीर्तानाच्या मोहत्सवामध्ये सहभाग घेतला. व त्यावेळी पंचकृषीतील सर्व गावकारी मंडळी उपस्थित होते.

## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" राज्यभर साजरा करण्यात येतो. याचाच एक भाग म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे दि.18जानेवारी पासून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन ग्रंथालयाचे जेष्ठ वाचक सभासद व प्रसिद्ध डॉक्टर श्री सुरेन्द्र दिक्षित यांचे हस्ते करण्यात आले.

सदर ग्रंथप्रदर्शन सर्वांसाठी खुले असून परिसरातील व शहरातील नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री सुभाष साबळे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तांत्रिक सहाय्यक सुधाकर गायधनी यांनी केले.तर आभार संजय कर्वे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय ठाकुर,नाटकर यांनी प्रयत्न केले.या प्रसंगी परिसरातील नागरिक,वाचक इ.उपस्थित होते.



## देवांग कोष्टी समाजाच्या वतीने शाकंभरी पौर्णिमा उत्सव; रक्तदान, आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** देवांग कोष्टी समाज,येवला यांचे वतीने शाकंभरी पौर्णिमा उत्सवा निमित्त श्री चौंडेश्वरी मातेला सौ व श्री आशुतोष भागवत यांचे शुभहस्ते पंचामृत अभिषेक करण्यात आला. या प्रसंगी रक्तदान शिबीर आणि कुणाल दराडे फाउंडेशन च्या वतीने मोफत नेत्रचिकित्सा व आरोग्य शिबीर ठेवण्यात आले, त्याचबरोबर श्री चौंडेश्वरी मातेला महिला मंडळाच्या हस्ते शाकभाज्यांची सजावट करण्यात आली.

शिबिरा मध्ये यावेळी रक्तदान शिबिर संकलनासाठी जनकल्याण रक्तपेढी नाशिक उपस्थित होते. आरोग्य शिबिरात नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग तपासणी करून त्याच ठिकाणी औषधे देण्यात आले तसेच मोफत शस्त्रक्रिया व अल्पदारात चष्मा फाउंडेशन च्या वतीने देण्यात येणार आहे यावेळी चौंडेश्वरी समाजाचे अध्यक्ष मनोज भागवत फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष कुणाल दराडे तसेच समाजाचे विश्वस्त युवक महिला मंडळ आदि उपस्थित होते. यावेळी कुणाल फाउंडेशन डॉक्टर मयुरी जामूनकर, डॉक्टर प्रमोद तिडके,डॉक्टर अमोल जगताप, डॉक्टर श्रद्धा माटे, डॉक्टर अमित गायकवाड, डॉक्टर अनिकेत बारी, डॉक्टर मुक्तानंद जयदीप बोरसे, आदिनी या आरोग्य शिबिरात तपासणी केली. सायंकाळी समाजाच्या वतीने श्री चौंडेश्वरी मातेची सामुदायिक आरती करून महिलासाठी हळदी कुंकवाचे आयोजन केल व प्रसाद वाटप करण्यात आला.

## बालक विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ताजनापूर यांची अजिंठा लेणीला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापुर येथील बालक विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ताजनापुर ता. खुलताबाद जिल्हा औरंगाबाद अजिंठा येथील लेणीला भेट देऊन विद्यार्थ्यांना संपूर्ण सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीचा मानसोक्त आनंद घेतला. याप्रसंगी प्रा .सुनील इनामदार, कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर अमोल दांडेकर नलावडे मॅडम, अतुल गुळवे, भगवान साळुंखे, किरण काळे, शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते.




## हर्षदा उबाळे आयडॉल कलारत्न पुरस्काराने सन्मानित; भरतनाट्यम क्षेत्रात विशेष कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

लोणंदःमनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या संस्थेच्या वतीने सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या गुणिजनांचा राज्यस्तरीय गुणिजन गौरव महासंमेलनातून सन्मान करण्यात आला.यावेळी सासवड ता.पुरंदर येथील भरतनाट्यम नृत्यांगणा हर्षदा गणेश उबाळे हिचा राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र आयडॉल कलारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.भरतनाट्य या क्षेत्रात हर्षदाने विशेष कामगिरी केल्याने तिच्या कार्याची दखल घेण्यात आलेली आहे.सासवड येथे संपन्न करण्यात आलेल्या कार्यक्रमातून तिला सन्मानित करण्यात आले.

या पुरस्काराबद्दल हर्षदा उबाळे हिचे सासवड सह पंचक्रोशीतून अभिनंदन करण्यात येत आहे.वयाच्या तिसऱ्या वर्षापासून हर्षदा उबाळे हीने भरतनाट्यमचे शिक्षण घेतलेले आहे.गुरू धनश्री स्वानंद लोमटे यांचे तिला मार्गदर्शन लाभलेले आहे.हर्षदा उबाळे हिने गंधर्व महाविद्यालय मुंबई येथे विशारद पर्यंतच्या परीक्षेमध्ये विशेष प्रावीण्य मिळविलेले आहे.वयाच्या १४ व्या वर्षी तिने अरंगयेत्रम ही भरतनाट्यमधील डिग्री तिने मिळविलेली आहे.वाघिरे विद्यालय येथे १ वर्षाचा ड्रामा स्कूल अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. ग्रामीण भागातील मुलींसाठी भरतनाट्यम चे वर्ग घेत आहे.युट्यूब वरील ऑस्करवाडी या वेबसिरीज मध्ये रियाची मुख्य भूमिका साकारलेली आहे.आज पर्यंत तिला अनेक पुरस्कारानी सन्मानित करण्यात आलेले आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक सेवा मंचातर्फे राज्यस्तरीय उत्कृष्ट कोरिओग्राफीसाठी (नृत्य) राज्य पुरस्कार,स्टार डायमंड इंडिया इंटरनॅशनल अवार्ड २०२३ सिध्दी फाउंडेशन (बेस्ट अन्सर अवार्ड),अखिल भारतीय नृत्य संमेलनात सलग तीन वर्षे उत्कृष्ट नृत्य ,मनुष्यबळ विकार्स लोकसेवा अकादमी तर्फे दिला,तीर्थ शिवराय हा कार्यक्रम पुणे, इंदौर, मिरज याठिकाणी सन्मानित,पुरंदर पालक संघ नृत्य साधी- प्रथम कमांक, शरद मल्हार स्पर्धेत उत्कृष्ट नृत्य उत्कृष्ट चेहरा प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आदी ठिकाणी तिच्या कलेची दखल घेत तिला सन्मानित करण्यात आलेले आहे. सासवड येथील वाघिरे महाविद्यालयातून आर्ट या शाखेतून शिक्षण घेत आहे.भरतनाट्यम या कला क्षेत्रातून एक चांगले यश मिळवून सासवड सह पंचक्रोशीतुन तिने एक वेगळी निर्माण केलेली असून अनेक मुली तिच्या मार्गदर्शना खाली भरतनाट्यम शिकू लागलेल्या आहे.माझ्या कलेची दखल घेतल्या बद्दल हर्षदा उबाळे हिने आयोजकांचे विशेष आभार मानलेले आहेत.शिवाय अनेक मुलींना भरतनाट्यम शिकवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे हर्षदा उबाळे हिने म्हटले आहे.



# श्री रामल्लला प्राणप्रतिष्ठेनिमित्त भव्य शोभायात्रा

## रामभक्तांसह माजी आ. बोर्डीकर, आ. मेघना बोर्डीकर, भावना बोर्डीकरांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** आयोध्येमध्ये आज श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा स्थापना संपन्न झाली. या निमित्त देशभर रामभक्तात उच्चकोटींचा आनंद आज दिसून आला. असाच उत्साह आज सबंध तालुक्यात दिसून आला. ग्रामीण भागा सह शहरात 22 तारखेच्या रात्री 12 वाजे पासून सबंध शहरात ढोलताशांचा गजर व फटाक्यांची आतिषबाजीने सबंध शहर दणाणून गेले होते. या पूर्वीच शहरातील सर्व मंदिराची स्वच्छता मोहीम माजी नगराध्यक्ष सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य रामभक्तांच्या सोबतीने संपन्न झाली. आज शोभायात्राच्या मार्गावरून रांगोळ्यांनी रस्ते लक्षवेधुन घेत होते. सबंध शहरात जय श्रीराम घोषणेने शहर भक्तीत विलीन झालेले जाणवत होते.

जिंतूर शहरांमध्ये विठ्ठल मंदिर हे श्रीराम मंदिरापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभेयात्रेने विशेष लक्ष वेधून घेतले ते राम रुपात हुबेहूब श्रीरामाची वेशभूषा केलेली जानवी गोविंद काबरा,तर लक्ष्मणच्या वेशभूषेत निधी सुनील भोंबे



तर सीतेच्या वेशभूषेत सूहाना घनश्याम जेथलिया व हनुमानाच्या वेशभूषेत श्रीहरी संदीप शर्मा आदींची भव्य शोभायात्रा शहरातून मार्गस्थ होतांना शहरातून जणू काय श्रीराम अवतरले असे जाणवत होते. या शोभायात्रा मध्ये शहरातील रामभक्त हजारो महिला, तरुणी सह पुरुषांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. या दरम्यान माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, आमदार मेघना बोर्डीकर, भावना बोर्डीकर सह माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, लक्ष्मणराव बुधवंत, विनोद राठोड, सुनील भोंबे पाटील यांचा सुद्धा सहभाग होता. या शोभायात्रा मध्ये आमदार मेघना बोर्डीकरांनी महिला सोबत फुगडी खेळत व रामलल्लाचा जयघोष करत सर्वांचे लक्ष वेधले. श्रीराममंदिरात भव्यदिव्य होमवहन करून यजमान राहुल देशमुख यांनी पूजा केली.या वेळी ऍड हरिहरराव देशमुख यांचीही उपस्थिती होती.विशेष बाब म्हणजे शोभायात्रा पोलीस वसाहती समोर येताच व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड यांच्या तर्फे भव्य शोभा यात्रेवर जेसीबीने रामाच्या सजीव झाकीच्या रथा वर विविध फुलांची उधळण करण्यात आली.

# कारवाई करून काम सुरु करा अन्यथा उपोषण करू; आरपीआयचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील सामाजिक सभागृहाच्या कामाला अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कार्यवाही करा व काम सुरु न झाल्यास अन्यथा बेमुदत उपोषण सुरु करण्यात येईल असा इशारा वैजापूर येथील आर पी आय मार्फत देण्यात आला आहे.

हे उपोषण दिनांक २६ जानेवारी पासून बेमुदत सुरु राहणार असल्याची माहिती आर पी आय गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

सविस्तर माहिती अशी की, वैजापूर शहरातील डॉ. बाबासाहेच आंबेडकर नगर मधील जीर्ण झालेल्या सामाजिक सभागृह नूतनीकरण कामासाठी नगरविकास विभागाने ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून या कामाची निविदा प्रक्रिया नगर पालिकेने केली आहे परंतु या कामात या जागेवर एक कुटुंब मालकीहक्क असल्याचा दावा करुन त्या कामात खोडा घालण्याची दादागिरी करत असून या जागेवर सन २००१ मध्ये स्वर्गीय लोकनेते आ. आर.एम. वाणी साहेब यांच्या विकासनिधीतून जवळपास ७ लाख रुपयांचा निधी खर्च करुन सामाजिक सभागृहाची इमारत उभारण्यांत आली होती. या इमारतीची नगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या रेकॉर्डवर नोंद नसल्याने सदरील व्यक्ती या जागेवर त्यांचा हक्क असल्याचा दावा करीत आहेत. या प्रकरणाची चौकशी करुन रखडलेले बांधकाम पोलिस बंदोबस्तात सुरु करुन आंबेडकरी जनतेस न्याय मिळवून द्यावा अन्यथा बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा आर पी आय चे वैजापूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन,राजवीर त्रिभुवन,राहुल त्रिभुवन,ताराचंद त्रिभुवन, किशोर त्रिभुवन तसेच श्रीकांत जाधव, संदीप त्रिभुवन,किशोर त्रिभुवन,संदीप पारखे

संतोष त्रिभुवन यांनी दिला असून सह याप्रसंगी कृ.उ बा स संचालक प्रशांत त्रिभुवन, वैजापूर नगरपरिषद चे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांची उपस्थिती होती.



# महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महात्मा ज्योतिबा फुले समाज कार्य महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागच्या वतीने 25 जानेवारी 2023रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमीत्त मतदार जाणिव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत कुमार वनंजे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ सर्जेराव कहाळे यांनी केले. याप्रसंगी युवकांनी योग्य उमेदवार निवडून लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदार



जाणिव जागृती करावी असे प्राचार्य डॉ प्रशांत कुमार वनंजे यांनी आवाहन केले. प्रा. डॉ. बाळासाहेब गवळी, प्रा. डॉ. प्रकाश शिंदे, प्रा डॉ राहूल हिवराळे, प्रा. डॉ. सुवर्णा चव्हाण प्रा. डॉ. स्मिता चव्हाण, रमेश खरात, बबनराव, राठोड, कैलास कुरंगळ ज्ञानेश्वर मदन ( रासेयो सहाय्यक) अंगद शिंदे, रविंद्र झोटे, गणपत मेहेत्रे प्रदीप भालमोडे, ज्योती महागडे, माणिक खरात, राजु गरूड, तसेच, सर्व स्वयंसेवक कार्यक्रमास उपस्थित होते.

# सोयाबीनच्या दरात घसरण सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** यावर्षी सोयाबीनच्या दरात मागील दीड महिन्यांपासून सातत्याने घट होत असून सध्या बाजारात सोयाबीनचे दर ४ हजार ४५० रुपयांपर्यंत खाली आले. सोयाबीनचे दर वाढतील या अपेक्षेने काही शेतकऱ्यांनी सोयाबीनची विक्री केली नव्हती, मात्र भाव वाढण्याऐवजी कमी होत आहेत.

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत २० जानेवारी रोजी ६ हजार ७८९ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४ हजार ४५० तर कमाल ४ हजार ५३६ म्हणजे सरासरी ४ हजार ४९३ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. १५ जानेवारीला सोयाबीनला अमरावती बाजार समितीत सरासरी ४ हजार ५५६ रुपये दर मिळाला होता.

या वर्षी सोयाबीनचे उत्पादनही अपेक्षित झालेले नाही. पावसात खंड पडल्यामुळे सोयाबीन पिकाची फारशी वाढ झाली नाही. ऐन फुलोरावस्थेत पीक असताना पावसाने दांडी मारल्यामुळे सोयाबीनचे अपेक्षित उत्पादन आले नाही. शिवाय बी-बियाणे, कीटकनाशके, मशागत आणि शेतमजुरीचे वाढलेले दर पाहता सोयाबीनने शेतकऱ्याला फारसे काही हातात लागू दिलेले नाही. एकरी दोन क्विंटलपासून उत्पादन झाले. हंगामात गरजेपुरते सोयाबीन विक्रीला काढून उर्वरित सोयाबीन भविष्यात भाव वाढतील या आशेने शेतकऱ्यांनी साठवून ठेवले. पण सध्या सोयाबीनचे बाजारभाव पाच हजारांवर गेलेले नाहीत. त्यामुळे नाइलाजास्तव शेतकरी सोयाबीन विकण्याच्या तयारीत आहे.

# ज्ञानेश्वर विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध मैदानी स्पर्धेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरातील ज्ञानेश्वर विद्यालय येथे आज दिनांक 23 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून. स्पर्धेचे उद्घाटन ज्ञानेश्वर विद्यालय चे मुख्याध्यापक शिवाजीराव वाघ सर , उपमुख्याध्यापक केशव राठोड सर, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्हाईस ऑफ मीडियाचे पत्रकार माबूद खान व इलेक्ट्रॉनिक मिडीया जिंतूर तालूका अध्यक्ष तथा स्वदेशी न्यूज संपादक अजमत पठाण उपस्थित होते. पर्यवेक्षक मोरे सर यांच्या हस्ते नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून शाळेच्या मैदानावर विविध क्रिडा स्पर्धांचे करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे इलेक्ट्रॉनिक मीडिया तालुकाध्यक्ष अजमत पठाण यांनी मैदानी खेळाडू चा परिचय करत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व सर्व खेळाडूंना कार्यक्रमाचे अध्यक्ष वाघ सरांनी व राठोड सर यांनी मार्गदर्शन केले व स्पर्धेस सुरुवात करून शुभेच्छा दिल्या क्रिडा स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यासाठी क्रिडा नियंत्रक म्हणून मोरे सर, घुले एन एम सर, सिरसाट बी ए सर, घुले केशवजी सर यांनी काम पाहिले. स्पर्धेसाठी पंच म्हणून पैठणे सर, सानप सर, चव्हाण सर , भुसारे सर सौ. फड मॅडम, सौ. घोबाळे मॅडम सौ. बहिरम मॅडम यांनी काम पाहिले.

स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यासाठी शाळेतील टारपे एस जी, टारपे एच डी ,पवार सर, कातकडे सर, येसके सर , घुगे सर, दहिफळे सर तसेच वरिष्ठ लिपिक चाटे सर शिक्षकेत्तर कर्मचारी बडे मामा, जंगले मामा, रवि गुट्टे, ग्रंथपाल सौ राख मॅडम व शाळेतील सर्वच कर्मचारी यांचे सहकार्य लाभले, संकलन वाव्हळे बी.व्ही. सर यांनी केले.



## सुधाकर बडगुजर यांना जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये दाखल गुन्ह्यातील संशयित शिवसेना ठाकरे गटाचे महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे. कुख्यात दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्ता याच्याबरोबर पार्टी केल्याच्या संशयाने अडचणीत आलेले ठाकरे गटाचे नाशिक महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या विरोधात बनावट कागदपत्रे सादर करत महापालिकेची फसवणूक केल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये दाखल गुन्ह्याचा तपास सुरू आहे. या गुन्ह्यात न्यायालयाने बडगुजर, साहेबराव शिंदे आणि सुरेश चव्हाण यांना नऊ जानेवारीपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला होता. ही मुदत संपल्यानंतर बडगुजर यांच्यावर अटकेची टांगती तलवार होती. परंतु, आता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. बडगुजर यांच्या वकिलाने न्यायालयाकडे बडगुजर यांची गोठवण्यात आलेली बँक खाती खुली करण्याची विनंती केली. ती न्यायालयाने फेटाळली.

# माळेगाव यात्रेतील व्यापाऱ्यांची विद्युत ठेकेदाराकडून कोट्यवधी रुपयांची लूट ?

## एका बल्बसाठी दररोज दीडशे रुपये आकारले : ठेकेदार, ग्रामपंचायतची मिलीभगत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील माळेगांव यात्रा येथे दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेली सर्वात मोठी यात्रा भरते राज्यसह परराज्यातील अनेक व्यापारी तब्बल १५ ते २० दिवस येथे व्यापार चालतो म्हणून यात्रेत सहभागी होतात. मात्र ग्रामपंचायत कार्यालयाकडून नेमण्यात आलेल्या विद्युत वितरण एजन्सी मार्फत एका लाईटच्या बल्बसाठी दीडशे ते दोनशे रुपये आकारण्यात येत असून यात्रेच्या वैभव भर पडण्यापेक्षा व्यापारांची अडवणूक करून आर्थिक पिळवणूक केली जात आहे. यामुळे वर्षानुवर्षे यात्रेचे वैभव कमी होत आहे.

> माळेगाव यात्रेसाठी नेमून दिलेल्या एजन्सीला माळेगाव ग्रामपंचायत जबाबदार असून एजन्सीने किती आकारणी करायची किंवा नाही तो त्यांचा अधिकार आहे महावितरण हे ग्रामपंचायत कार्यालयाला यात्रेचे आकारणी बिल देत असते.
> **राहुल कोटीतिर्थ, महावितरण सहाय्यक अभियंता माळाकोळी.**

माळाकोळी ३३ के.व्ही. महावितरण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या माळेगाव यात्रेच्या कालावधीमध्ये ग्रामपंचायत कार्यालया मार्फत एका एजन्सीला विद्युत आकारण्याचे काम दिले जाते. सरपंच व सचिव हे आपल्या मर्जीतील व्यक्तीच्या एजन्सीला टेंडर देऊन आर्थिक भागिदारी ठेवतात व तो एजन्सीधारक दिलेल्या अटी शर्तीत आधीन राहून विद्युत आकारणी न करता एजन्सी मार्फत अधिकची रक्कम आगाशी पाळणे, मौत का कुवा, लोकनाट्य मंडळ, सर्कस, बॉम्बे डान्स यांच्यासह छोट्या मोठ्या व्यापाऱ्याकडून शासनाच्या नेमण्यापेक्षाही तीन ते चार पट अधिकची विद्युत आकारणी घेऊन मनमानी कारभार सुरू असल्यामुळे माळेगाव यात्रेत येणाऱ्या व्यापाऱ्यांची एजन्सी मार्फत लूट होत आहे. अशा एजन्सीवर जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, यात्रा सचिव यांनी चौकशी करून शासनाची फसणूक केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

## 'सोनी साडी सेंटर'कडून विद्यार्थ्यांना वस्त्राचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सामाजिक जाणीव ठेवून आपण समाजाचे देणे लागतो या उदात्त भावनेने लोह्यातील प्रसिद्ध व्यापारी तथा "सोनी"चे संचालक बालाजी सावकार कोटगीरे यांनी आठ शाळेतील आणि दोन अनाथालयातील अशा एकूण ६८८ शालेय विद्यार्थ्यांना भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अंगवस्त्र (कपडे) वाटप केले. लोहा शहरातील प्रतिष्ठित व्यापारी असलेले "सोनी"चे संचालक बालाजी सावकार कोटगीरे हे सातत्याने विविध सामाजिक कार्यक्रमात सहभागी होत असतात. त्यांनी अनेक गरजू तसेच होतकरू साठी मदतीचा हात पुढे केला आहे. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असते. त्याची जाणीव ठेवून तसेच गावातील प्रमुखकाकडून आलेल्या सूचनेनुसार कोटगिरे यांनी लोहा शहरासह तालुक्यातील आठ शाळा आणि दोन अनाथालयांची निवड करून शालेय विद्यार्थ्यांना अंगवस्त्र (कपडे) वाटप केले. त्यामध्ये जि. प. प्रा. शाळा धावरी - ८२, जि. प. प्रा. शाळा किरोडा - ६९, जि. प. (कन्या) प्रा. शाळा सोनखेड - १३०, जि. प. प्रा. शाळा बोरगांव (आ)- ११७, जि. प. प्रा. शाळा सूनेगाव - ५५, सोमसिंग नाईक आश्रमशाळा कंधार रोड लोहा-५५, शिवछत्रपती मा. विद्यालय - ३३, जय महाराष्ट्र मा. विद्यालय - ७२, शासकीय अनाथ विद्यार्थी वसतिगृह लोहा- ३५, सावित्रीबाई फुले अनाथालय -१४ असे एकूण ६८८ शालेय विद्यार्थ्यांना अंगवस्त्राचे वाटप करण्यात आले.



बोरगाव (आ) येथील जि. प. प्रा. शाळेत सोनीचे संचालक बालाजी सावकार कोटगिरे, उपसरपंच प्र. पुंडलिक पाटील बोरगांवकर यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य श्यामराव पाटील, भिमराव पाटील, शा.व्य.स. अध्यक्ष निवृत्ती पाटील, शाळेचे सहशिक्षक रमेश पवार, अंबर फुलसे, राहुल हारडे, सुचिता गोधने, ज्योती फुके, व्यंकट जाधव सह गावातील नागरिकांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## नाशिकमध्ये थंडीची लाट, तापमान ८.६ अंशावर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** संपूर्ण हंगामात कडाक्याच्या थंडीपासून दुरावलेल्या नाशिककरांना अखेरच्या टप्प्यात तिची सुखद अनुभूती मिळत असूनहंगामातील ८.६ अंश सेल्सिअस नीचांकी तापमानाची नोंद झाली. हंगामात प्रथमच तापमान इतके खाली घसरल्याने नाशिककरांना हुडहुडी भरली आहे. दोन दिवसांपासून तापमानात घट होत असून नाशिकमध्ये थंडीची लाट आल्याची स्थिती आहे. यंदाच्या हंगामात कडाक्याची थंडी नाशिकमधून अंतर्धान पावल्याची स्थिती होती. एरवी डिसेंबर, जानेवारीत हुडहुडी भरवणारी थंडी अनुभवयास मिळते. यावर्षी डिसेंबर व जानेवारीच्या मध्यापर्यंत तसे झाले नव्हते. १६ जानेवारी रोजी पहिल्यांदा तापमान १० अंशाच्या खाली गेले. त्या दिवशी ९.८ अंशाची नोंद झाली. बुधवारी घटत्या तापमानाने नवीन नीचांक नोंदविला. या दिवशी नऊ अंशाची नोंद झाली. गुरुवारी तापमान आणखी कमी होऊन ८.६ अंश सेल्सिअसवर आल्याचे हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे. दोन दिवसांपासून तापमानात घट होत असून थंडीने मुक्काम ठोकल्याचे चित्र आहे. उत्तरेकडून वाहत येणाऱ्या वाऱ्याचा प्रभाव नाशिकच्या वातावरणावर पडतो. उत्तरेकडे बर्फवृष्टी आणि तीव्र थंडी असतानाही पश्चिम भागातील स्थितीमुळे वाऱ्यांना अवरोध निर्माण झाला होता. अल निनोचाही प्रभाव आहे. यामुळे नाशिकमध्ये नेहमीप्रमाणे थंडी जाणवली नसल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जात होते.

## कविता म्हणजे अनुभवाची लयबद्ध मांडणी : प्रा. मधुकर जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**दे. राजा :** कविता ही अनुभवांची लयबद्ध मांडणी असते, असे प्रतिपादन श्री व्यंकटेश महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जे. बी. के. विद्यालय यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित कवी संमेलनामध्ये ते उद्घाटक म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर निकम सर प्राचार्य काळे सर तर कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ कवी पी.जी. तांबेकर उपस्थित होते. कवी संमेलनामध्ये संजय राऊत, सुधाकर चिंधोटे, दत्ता गवळी, आकाश देशमुख, साबिर शेख, असलम शहा, संदीप जाधव या कवींनी सहभाग घेतला. उद्घाटकीय मनोगतामध्ये पुढे बोलताना प्रा. मधुकर जाधव यांनी कवितेचे भावविश्व हे वयानुसार बदलत असते आपल्यातला कवी जसे अनुभव बदलत जातील तसा बदलत जातो अशी माहिती दिली. साहेब ही सामाजिक आशयाची कविता सादर करून त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली. पानिपत गीतकार सुधाकर चिंधोटे यांनी कवितेच्या माध्यमातून शिवरायांचा पराक्रम श्रोत्यांसमोर मांडला. प्रा. अरुण आहेर यांनी विद्रोही कविता सादर करून समाज व्यवस्थेवर परखड भाष्य केले. याप्रसंगी सहभागी कवींनीही विविध विषयावर आधारित कविता सादर करून समस्यांना वाचा फोडली. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कवी बोरकर यांनी केले.




## चंद्रपुरात होणार महानाट्य–जाणता राजा

### चांदा क्लब ग्राउंडवर 2 ते 4 फेब्रुवारीपर्यंत आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिवछत्रपतींच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतच्या



रोमांचकारी प्रसंगांना साकारणारे आशिया खंडातील सर्वात मोठे महानाट्य 'जाणता राजा ' चंद्रपूरकरांच्या भेटीला येत आहे. राज्याचा सांस्कृतिक विभाग, जिल्हा प्रशासन व चंद्रपूर महानगरपालिका मार्फत या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असून 2, 3, व 4 फेब्रुवारी 2024 रोजी चांदा क्लब ग्राउंड, चंद्रपूर येथे प्रयोग होणार आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, उपायुक्त मंगेश खवले, विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, मुख्याधिकारी विशाल वाघ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे आदी उपस्थित होते.राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार पद्मविभूषण इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित केलेला हा प्रयोग चांदा क्लब ग्राउंड, चंद्रपूर येथे हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने फिरत्या रंगमंचावर रंगणार आहे. यासाठी प्रवेशिका असेल, मात्र प्रवेश मोफत ठेवण्यात आला आहे. दररोज सायंकाळी 6 वाजता या प्रयोगाला सुरुवात होईल. उंट ,घोडे यांचा वापर आणि शिवरायांच्या काळातील सर्व रोमांचक घटनाक्रमाचे जिवंत चित्रण 200 च्या वर कलाकार करणार आहेत.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद





# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांसाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर

## हॉटेल व रिसॉर्टमध्ये स्थानिकांना 50 टक्के नोकऱ्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत पर्यटनासाठी इलेक्ट्रिकल वाहनांना प्रोत्साहन देण्यात येणार असून प्रत्येक गेटवर या वाहनांना परवानगी देण्यात येणार आहे. देशात प्रथमच इलेक्ट्रिक वाहनांचा पर्यटनासाठी उपयोग करण्यात येत आहे. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य विकासाचे विशेष प्रशिक्षण सुरु करण्याच्या सूचना, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिल्या.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत निसर्ग पर्यटनासंबंधी नियमन करणे तसेच व्याघ्र प्रकल्प व सभोवतालच्या क्षेत्राच्या सोयी सुविधांच्यादृष्टिने वाढ करण्यासाठी विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या स्थानिक सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक कुशाग्र पाठक, ताडोबा कोअरचे उपसंचालक नंदकिशोर काळे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मानद वन्यजीव रक्षक विवेक करंबळेकर, उपविभागीय अधिकारी श्रीमती शिवनंदा लंगडापूरे, मोहर्लीच्या सरपंच श्रीमती सुनिता कातकर, कोलाऱ्याच्या श्रीमती शोभाताई कोइचाळे, निसर्ग पर्यटन मंडळाचे धनंजय बापट, ट्रॅक्स संस्थेच्या श्रीमती पुनम धनवटे, इको-प्रो संस्थेचे बंडू धोतरे, मुकेश भांदककर, किरण मनुरे, योगेश दुधपचारे, अनिल तिवाडे, संजय मानकर, प्रफुल्ल सावरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बफर क्षेत्रामध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्राधान्याने द्यावा अशा सूचना करतांना श्रीमती बिदरी यांनी बफर क्षेत्रात होम स्टे करिता स्थानिक कुटुंबांनाच प्राधान्य आहे. बफर क्षेत्रातील सर्व रिसॉर्ट्स , होमस्टे नियमितीकरणासाठी तपासणी करावी व नियमबाह्य असलेल्यांवर त्वरीत कार्यवाही करावी. या क्षेत्रातील सर्व जीप्सीधारक हे स्थानिक असावे व मंजुर पर्यटन आराखड्यानुसार त्यांची नोंदणी करावी. गाईड यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी तसेच विदेशी पर्यटकांच्या दृष्टिने इंग्रजी व हिंदी भाषेचे प्रशिक्षण, व्याघ्र प्रकल्पात असलेले वन्यजीव, पक्षी तसेच वृक्षांबद्दलची संपूर्ण माहितीबाबत विशेष प्रशिक्षण आयोजित करावे अशा सूचना यावेळी करण्यात आल्या.

इरई सिंचन प्रकल्पाच्या बॅक वॉटर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वन्यजीवांचा वावर आहे. परंतु या क्षेत्रात तारेचे कुंपण टाकून शेती करण्यात येत आहे. त्यामुळे वन्यजीवांना पिण्याच्या पाण्यापर्यंत पोहचणे शक्य होत नाही. त्यामुळे महाजनकोच्या माध्यमातून सर्व अतिक्रमण काढुन तेथे वृक्षारोपणासारखा उपक्रम राबविण्याला प्राधान्य देण्यात यावे अशी सूचना करतांना श्रीमती बिदरी यांनी पर्यटकांसाठी उपलब्ध जीप्सी तसेच पर्यटक शुल्कामध्ये वाढ करण्याच्या दृष्टिने प्रस्ताव तयार करावा, तसेच बफर क्षेत्रात पर्यटकांसाठी आवश्यक नियम तयार करुन त्यानुसार पर्यटनाचा मार्ग निश्चित करावा असेही श्रीमती बिदरी यांनी सांगितले.

प्रारंभी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक कुशाग्र पाठक यांनी स्थानिक सल्लागर समितीच्या मागील बैठकीचे इतिवृत्त सादर करुन त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. यावेळी श्रीमती पूनम धनवटे, बंडू धोतरे, धनंजय बापट, योगेश दुधपजारे तसचे सरपंच श्रीमती शोभाताई कोचाडे व सुनिता कातकर यांनी विविध सूचना मांडल्या. त्याअनुषंगाने अहवाल सादर करावा असे यावेळी विभागीय आयुक्तांनी सांगितले.

# 29 जानेवारी रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करीअर सेंटर, चंद्रपूर आणि श्री. साई आय.टी.आय. भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन 29 जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते पार पडणार आहे.

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच नामांकित उद्योजकांचा थेट नोकरी इच्छुक उमेदवारांशी संपर्क करण्याच्या दृष्टीने मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. सदर मेळावा सोमवार, दि.29 जानेवारी 2024 रोजी सकाळी 11 वाजता गुंडावार लॉन, भाजी मार्केट, विजासन रोड, भद्रावती येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून 850 पेक्षा जास्त पदे भरण्यात येणार असून विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याकरीता HTTPS://ROJGAR.MAHASWAYAM.GOV.IN या वेबसाईटवर नोंदणी करुन ऑनलाइन अप्लाय करावे.

सदर रोजगार मेळाव्यात सन्सूर इंडिया प्रा.लिमि.चंद्रपूर, जय महाराष्ट्र प्लेसमेंट सर्व्हिसेस, भारत पे प्रा. लिमि.,एस.बी.आय.लाईफ इन्शुरन्स, टॅलेंनसेतू प्रा. लिमि.,पुणे आदी कंपन्या या मेळाव्यात सहभागी होत आहे.

**आवश्यक कागदपत्रे:** मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी आधारकार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती (कमीत कमी तीन प्रती) सोबत ठेवाव्यात. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त बेरोजगार उमेदवारांनी रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन लाभ घ्यावा.तसेच मेळाव्याच्या अधिक माहितीकरीता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या 07172-252295 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त भैय्याजी येरमे यांनी कळविले आहे.






# उमेदच्या माध्यमातून महिला समर्थ भारताच्या योगदानात मोलाची भर देतील : शाम हेडाऊ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महिलांमध्ये उद्योजकतेसाठी आवश्यक असलेले



व्यवस्थापन कौशल्य हे आधीपासूनच असते. फक्त त्याला व्यावसायिकतेची जोड दिल्यास महिला यशस्वी उद्योजिका म्हणून निश्चितच यश मिळवतील. उमेद याबाबतीत महिलांच्या सक्षमीकरणाकरता मोठ्या प्रमाणात विविध प्रशिक्षणाचे आयोजन करीत असून उमेदच्या महिला या समर्थ भारताच्या योगदानात मोलाची भर घालतील, असे प्रतिपादन मोटिव्हेशनल ट्रेनर प्राध्यापक शाम हेडाऊ यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान द्वारे आयोजित तालुका अभियान अंतर्गत बिगर शेती आधारित प्रशिक्षण वर्गात ते बोलत होते . महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद ) द्वारे राजोली , मारोडा , बेंबाळ , जुनासुरला , चिंचाळा , केळझर अशा तीन प्रभागांकरिता बिगर शेती व्यवसाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक प्रभागाला दोन दिवसाचं प्रशिक्षण देण्यात आलं . या प्रशिक्षणाचा समारोप दिनांक 24 जानेवारी रोजी समुदाय संचालित प्रशिक्षण केंद्र , मुल येथे पार पडला . तालुका अभियान व्यवस्थापक नितीन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बिगर शेती व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपीय कार्यक्रमाला ब्लॉक क्लस्टर कॉर्डिनेटर जयश्री खोब्रागडे, प्रभाग समन्वयक रुपेश आदे , कार्यरत तज्ञ सत्यवान मोगरकर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना तज्ञ प्रशिक्षक शाम हेडाऊ यांनी देशांमध्ये असलेल्या मातृशक्तीला व्यवसायाच्या क्षेत्रात येण्यासाठी आवश्यक ते कौशल्य निर्माण व्हावेत म्हणून देश पातळीवर कौशल्य विकास योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांच आयोजन करण्यात येत आहे. यात आपण सहभागी व्हावे असे आवाहन केले. तसेच कौटुंबिक व्यवस्थापन कौशल्य यालाच व्यावसायिक क्षेत्रात वापरल्यास तुम्ही एक यशस्वी उद्योजिका म्हणून यश मिळवू शकता. त्याकरिता आवश्यक असलेलं व्यक्तिमत्व विकास ,वेळेचे नियोजन, ध्येय निश्चिती ,व्यवसाय क्षेत्रातील नवनवीन संधी, वस्तूंचे विपणन ,वस्तू विक्रीचे कौशल्य अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

ब्लॉक क्लस्टर कॉर्डिनेटर जयश्री खोब्रागडे यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनाची भूमिका व महत्त्व स्पष्ट करत महिलांना उमेदच्या माध्यमातून मोठी संधी उपलब्ध असून महिलांनी आता आत्मनिर्भर व्हावं व व्यवसायाच्या क्षेत्रात स्वतःचे नाव मोठे करावे यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन उमेद च्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले . प्रभाग समन्वयक रुपेश आदे यांनी सुद्धा महिलांसाठी उमेद हे एक नवी दिशा देणारे केंद्र असून महिलांनी आता नव्या उमेदीने पुढे येऊन स्वतःची स्वप्न पूर्ण करावीत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाग कार्यरत तज्ञ सत्यवान मोगरकर यांनी तर आभार प्रदर्शन जयश्री खोब्रागडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी पथक परिश्रम घेतले.

# मामाने केले १४ वर्षीय भाचीचे लैंगिक शोषण

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मामाने आपल्या १४ वर्षीय भाचीचेच लैंगिक शोषण केले. ही धक्कादायक घटना मध्यप्रदेशातील मुलताई तालुक्यातील एका गावात घडली. पीडित मुलीला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केल्यावर वैद्यकीय तपासणीनंतर ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी आरोपी मामाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पीडित मुलीच्या शाळेला २२ जानेवारी रोजी सुटी होती. ती गावातील एका कार्यक्रमात जेवण करण्यासाठी गेली होती. परत येत असताना रस्त्यात तिला तिची मामी भेटली. त्यामुळे ती मामीसोबत त्यांच्याकडे गेली.

मामी बाहेर गेल्यानंतर पीडित मुलगी व तिचा मामा हे दोघे घरी होते. त्याने तिचे लैंगिक शोषण केले. सदर घटनेनंतर पीडित मुलगी ही कशीबशी घरी पोहोचली. तिने घडलेला प्रसंग आईला सांगितला.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# युवकांनी निसर्ग समाज आणि अर्थकारण याकडे लक्ष द्यावे

## प्रा. गणेश शिंदे : शब्दांमध्ये सामर्थ्य महान आहे

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शब्दांमध्ये प्रचंड ताकद असून शब्दाचे सामर्थ्य ओळखता आले पाहिजे. बोलताना वाकताना शब्द जपून वापरावेत ,शब्दामुळे महाभारत घडले ,शब्द हे अनमोल ठेवा असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.गणेश शिंदे यांनी केले

जिंतूर येथे व्हाईस ऑफ मीडिया व प्रेस क्लबच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते रविवार रोजी बोलत होते. व्यासपीठावर सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर ,प्राचार्य श्रीधर भौबे, उद्योजक ब्रिजगोपाल तोष्णीवाल, पोलीस निरीक्षक दिलीप तिडके, उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, वैद्यकीय अधीक्षक रवीकिरण चांडगे ,उद्योजक आर. बी. घोडके, प्राचार्य बळीराम वटाणे ,माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख ,अँड मनोज सारडा ,सुधीर शहाणे, सचिन देवकर, अरुण शहाणे ,देवेंद्र भुरे ,सत्यनारायण शर्मा ,डॉ. देवराव कराळे ,गजानन देशमुख, मारुती जुमडे, डाक निरीक्षक उपविभाग जिंतूर बि. आर. शिंदे, सिद्धार्थ अच्छा, ज्ञानेश्वर मते, लक्ष्मण बुधवंत, प्रवीण भट आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर होते. यावेळी दोन तास गणेश शिंदे यांनी प्रबोधन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की शब्दांना शेकडो वर्षाचे अधिष्ठान आहे. त्यामुळे शब्द जपून वापरावे, आपल्या वागण्यातून आदर्श निर्माण केला. तरच मुलावर योग्य संस्कार निर्माण होऊ शकतात. परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करावी लागते .आयुष्यात संघर्ष केला पाहिजे. मुलांना संघर्ष दाखवता आला पाहिजे .मुलांनी निसर्ग, समाज ,अर्थकारण समजून घेतले पाहिजे, पालकाचे आधुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुलावर पालकांनी दडपण टाकू नये. त्यांच्यामध्ये जे चांगले असेल ते शोधावे. तरच खऱ्या अर्थाने येणारी पिढी सशक्त आणि मजबूत तयार होईल. विशेषता मुलींनी पालकाची मान खाली जाईल अशी कोणत्याही काम करू नये. पालकाचा जीवनाचा संघर्ष समोर ठेवावा, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चोरडिया यांनी केले. आभार प्रदर्शन अँड मनोज सारडा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रेस क्लबचे तालुकाध्यक्ष मंचक देशमुख, व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष भागवत चव्हाण, नेमिनाथ जैन, प्रशांत मुळी, सचिन रायपत्रीवार, राम रेघाटे, संदीप माहूरकर, नितीन रोकडे, गुलाबराव शिंदे, संतोष तायडे, राजू गारकर, दिलीप माघाडे ,राहुल वाहूळे, नितीन बंगाळे, दिलीप देवकर, शंकर जाधव, माबूदखान, आबासाहेब देशमुख, राजाभाऊ काळे आदींनी प्रयत्न केले.




**हे ठरले पुरस्काराचे मानकरी :** विभागीय पातळीवर पुरस्कार वितरणात लोकमतचे उपसंपादक मारुती जुमडे यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता पुरस्कार तर हिंगोली येथील देशोन्नतीचे जिल्हा प्रतिनिधी बसंत कुमार भट यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला . या शिवाय सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर सहकार रत्न पुरस्कार तर उद्योजक आर बी घोडके यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर उद्योग रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .

**शैक्षणिक किटचे वाटप :** व्हॉइस ऑफ मीडिया व प्रेस क्लबच्या वतीने तालुक्यातील सचिन रायपत्रीवार, शकील अहमद, शंकर जाधव , भागवत चव्हाण यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले .




# शासकीय योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचवा : रॉ.कॉं. जिल्हा उपाध्यक्ष : वायाळ

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध शासकीय योजना राबविल्या जातात परंतु आजही सदर योजनाचा प्रचार प्रसार झाला नाही आणि योजना राबविणाऱ्या यंत्रणा उदासिन असल्यामुळे सर्व सामान्य माणूस शासकीय योजना पासून वंचित राहतो.

चिखली तहसील कार्यालयात शेळगाव आटोळ येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला राष्ट्रीय अर्थसहाय्य योजनेचा व संजय गांधी निराधार योजनेचे आदेश वाटप करत असताना राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ पुढे म्हणाले की शासकीय योजना राबविण्याची प्रक्रिया सोपी व्हावी यासाठी सामाजिक क्षेत्रात गाव पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी पुढे येवून लोकांना योजना विषयी माहिती दिली पाहिजे व सहजतेने लाभार्थींना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

यावेळी शेळगाव आटोळ तालुका चिखली येथील श्रीमती प्रयागबाई गजानन आटोळे व गोपाल गजानन आटोळे यांना मंजुरीचे आदेश देण्यात आले. यासाठी चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक कृष्णा मिसाळ यांनी पाठपुरावा केला तहसिलदार सुरेश कव्हळे यांनी सहकार्य केले यावेळी अंकुश थूट्टे प्रसाद पाटील इत्यादी मंडळी उपस्थीत होते.

# तालुकास्तरीय खो - खो स्पर्धेत जिल्हा परिषद प्रा. शा. भोसी शाळेचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** त्र्यंबक सी. पोले साहेब (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जिंतूर) यांच्या प्रेरणेने तालुकास्तरीय खो - खो स्पर्धा बेलखेडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या स्पर्धेमध्ये जी. प. प्रा शाळा भोसी येथून मुलांचा व मुलींचा संघ सहभागी झाला होता. स्पर्धेत मुलांच्या संघाने सेमीफायनल पर्यंत मजल मारली. तर मुलींचा संघ उपविजेता ठरला दोन्हीही संघाने खेळाचे खूप छान प्रदर्शन केले. मुलींचा उपांत्य सामना अत्यंत चुरशीचा होता उपांत्य सामन्यात प्रथम दोन्हीही संघाने सारखेच खेळाडू बाद केले व सामना अनिर्णीत झाला. विजयी संघ निवडण्यासाठी पुन्हा कमी वेळेचा सामना खेळवण्यात आला यामध्ये भोसी मुलींच्या संघाने मुसंडी मारत सहज विजय मिळवला व अंतिम सामन्यात स्थान निश्चित केले .अंतिम सामन्यात अत्यंत थोड्या फरकाने पराभव झाला. व संघ उपविजेता ठरला. द्वितीय क्रमांक मिळाल्या बद्दल संघाचे हार्दिक अभिनंदन . विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ग्राउंड ची नियमानुसार आखणी करून विद्यार्थ्यांना नियमांचे योग्य आकलन व्हावे म्हणून मार्गदर्शन करणारे शाळेतील वरिष्ठ शिक्षक श्री. सानप सर, विद्यार्थ्यांना योग्य नियमानुसार खेळाचे प्रशिक्षण देणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री.खुडे सर, श्री. भांबळे सर, श्री. बोकील सर सर्व क्रीडा स्पर्धा पार पाडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या श्रीमती. डाखोरे मॅडम, श्रीमती. मुक्किरवार मॅडम, श्रीमती. घेवंदे मॅडम, श्रीमती जगताप मॅडम सर्वांनी कौतुक करून अभिनंदन केले. जिंकलेल्या मुलींच्या व मुलांच्या दोन्हीही संघाचे जिंतूर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री एम.डी. घुगे सर यांनीही अभिनंदन केले!!!

संघाला खेळण्यासाठी प्रोत्साहित करणारे शा.व्य. समिती अध्यक्ष, सदस्य यांचे विशेष आभार! तसेच शालेय क्रिडा स्पर्धा बक्षीस वितरण करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य करणारे भोसी गावचे सरपंच मा रामप्रसाद सोनूळे यांचे ही विशेष आभार! तसेच विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी स्पोर्ट ड्रेस उपलब्ध होण्यासाठी अर्थ सहाय्य करणारे भोसी गावचे उपसरपंच विठ्ठल भाऊ ठोंबरे यांचे ही शाळेच्या वतीने मुख्याध्यापक श्री खुडे सर यांनी विशेष आभार मानले !

तसेच खेळाडूचे मौजे भोसी गावचे सरपंच,उपसरपंच अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सदस्य यांनी सर्व विजेत्या संघाचे अभिनंदन केले, व सर्व स्तरातून विजेत्या संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





# प्रभू श्री विश्वकर्मा जयंती मंडळ अध्यक्षपदी बालाजी पांचाळ गोलेगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सकल विश्वकर्मा समाजाचे प्रभू श्री विश्वकर्मा यांच्या जयंतीच्या नियोजन निमित्ताने व कार्यकारिणी निवड करण्यासंदर्भात नुकतीच बैठक घेण्यात आली. त्यामध्ये जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी बालाजी पांचाळ गोलेगावकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शहरातील शासकीय विश्रामगृहात नुकतीच जयंती मंडळ कार्यकारिणी निवड करण्यासंदर्भात सकल विश्वकर्मा समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक हभप आत्माराम महाराज रायवाडीकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्रभु श्री विश्वकर्मा जयंती दि. २२ फेब्रुवारी रोजी गुरुवारी जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त जयंती मंडळाच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच जयंती मंडळाची कार्यकारिणी गठीत करणे यासाठी सदर बैठकीचे आयोजन कर यात आले होते. याप्रसंगी सर्वानुमते जयंती मंडळ कार्यकारिणी निवडण्यात आली ती पुढील प्रमाणे - अध्यक्ष- बालाजी पांचाळ गोलेगावकर, उपाध्यक्ष- विनोद पांचाळ डोंग्रजकर, कोषाध्यक्ष- देवानंद पांचाळ, सचिव- माधव पांचाळ अंतेश्वरकर, सहसचिव- अनंत गुंजकर, वैभव जगताप आदींची निवड करण्यात आली.

बैठकीस राजाराम पांचाळ अंतेश्वरकर, एव्हीचे संचालक विठ्ठल पांचाळ, बाबुराव पांचाळ, श्रीरंग पांचाळ, दिलीप पांचाळ, विरेंद्र पांचाळ, स्वप्नील पांचाळ अंतेश्वरकर, दिगांबर पांचाळ मंगरुळकर, संतोष पांचाळ सुनेगावकर, साईनाथ पांचाळ, माधव पांचाळ, केशव पांचाळ, भागवत पांचाळ, योगेश पांचाळ, सुधीर अंबेकर, श्रीधर पोतदार, नामानंद रामेज्वर सह बहुसंख्य समाज बांधवांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत अयाती दांदडे सुवर्ण पदकाने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील ग्राम मांगुळ झनक येथील रहिवासी असलेले इंजि. अमोल जनार्दन दांदडे व डॉ सुषमा अमोल दांदडे यांची मुलगी व रिसोड पंचायत समिती सदस्य भुषण विलासराव दांदडे यांची पुतणी कु.अयाती अमोल दांदडे हिने १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२४ दरम्यान देशातील रायपूर, छतीसगड येथे संपन्न झालेल्या ६७ - व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सांघिक सुवर्ण पदक मिळवले. या आधी सुद्धा तिने विविध वैयक्तिक व सांघीक स्पर्धेत सहभाग घेतला व मेडल सुध्दा पटकावलं त्यामध्ये जम्मू येथे राष्ट्रीय टेनिस बॉल स्पर्धेत



महाराष्ट्राला ब्राँझ मेडल मिळवून दिले त्यानंतर २०२३ मध्ये के. खोडाद्रा अहमदाबाद, गुजरात येथे झालेल्या 4 थ्या फ्रेडरेशन कप सिनियर राष्ट्रीय टॉप टेनिस स्पर्धा - 2023 मध्ये सांघिक स्पर्धेत कास्य पदक मिळाळे होते.व त्यांनतर सोलापूर येथे झालेल्या १० व्या राज्यस्तरीय सिनियर सॉफ्ट टेनिस स्पर्धेत पुण्याकडून खेळताना सांघिक रौप्य पदक तसेच, ९ व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर सॉफ्ट टेनिस स्पर्धेत पुणे जिल्हा कडून खेळताना वैयक्तिक कास्य पदक, सांघिक कास्य पदक आणि वैयक्तिक डबल्स मध्ये कास्य पदक मिळवले होते.नेहमी प्रमाणे यावेळेसही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन दाखवत सुवर्ण पदक पटकावले.

ती आपल्या यशाचे श्रेय श्री. मिलिंद मारणे सर, श्री. प्रशांत रणदिवे सर, श्री. मुकेश मोहिते सर , श्री. विल्सन सर आणि श्री. रवींद्र सोनावणे सर यांच्यासह आपल्या आई वडिलांना देत आहे.

# उबाठा नेत्यांना पंतप्रधानांच्या उपवासाची चेष्टा करण्याचा अधिकार नाही

## प्रवक्ते राम कुलकर्णी यांची खरमरीत टिका

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी मंदिर ट्रस्टने सुचविलेल्या धर्मशास्त्र नियमाला अनुसरून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी तब्बल अकरा दिवस केलेल्या उपवासाची उबाठा नेते उद्धवजी ठाकरे आणि खा.संजय राऊतांनी नाशिकच्या पवित्र तीर्थक्षेत्रावरून जाहिर सभेत चेष्टा करीत सनातन हिंदु धर्माच्या धर्मशास्त्र संस्कृतीचा अपमान केल्याची खरमरीत टिका भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, २२ जानेवारी रोजी आयोध्येत प्रभु रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी अकरा दिवसांचे उपवास अनुष्ठान केले.



दरम्यानच्या काळात त्यांनी विदेशात कुठे ही दौरे न करता देशांतर्गत पवित्र तीर्थक्षेत्राला भेटी देताना रावणाच्या लंकेला जाण्यासाठी संत हनुमानाच्या वानरसेनेने सेतु बांधला. त्या पवित्र सागर किनाऱ्याला देखील त्यांनी भेट दिली. वास्तविक पहाता प्राणप्रतिष्ठा ज्यांच्या हातून होणार आहे. त्यांच्यासाठी धार्मिक आचारसंहिता असते. अयोध्या मंदिर ट्रस्टने पंतप्रधानाला काही गोष्टी सुचविल्या देखील होत्या. पण, ज्यांचं जीवन तपस्वी आणि भारतीय हिंदु संस्कृतीचं जतन करणाऱ्या त्या पंतप्रधानांनी तीन दिवसांचे उपवास अनुष्ठान सांगितले असता अकरा दिवसांचे केले. उपवास खरं तर धर्मशास्त्रात अत्यंत महत्वाचे तपस्वी साधन म्हणून ओळखल्या जाते. नवरात्रीमध्ये नऊ दिवसांचे उपवास तर कुणी पशुपती व्रत करते. संकट चतुर्थी कुणी करतं तर हरितालिकेला देखील उपवास करते. सुर्यनारायणाचे उपवास देखील पाळल्या जातात. आषाढी एकादश असेल किंवा पंधरवाडी एकादश एवढेच नव्हे तर आठवड्यातले सारेच वार वेगवेगळ्या धार्मिक श्रद्धेनुसार भाविक भक्त करतात. हिंदु संस्कृती मध्ये रूढी परंपरेनुसार हा श्रद्धेचा भाग म्हणुन ओळखल्या जातो. प्रभु रामचंद्र वनवासात असताना देखील चौदा वर्षे त्यांनी केवळ फळ, कंदमुळे खावुन उपवास केले. उबाठा शिवसेनेचं काल नाशिकात अधिवेशन संपन्न झालं. ज्या उबाठा नेत्यांनी काळाराम मंदिरात जावून दर्शन घेताना पवित्र स्थानावरून राजकिय लढाईची सुरूवात केली. त्याच उद्धवजी ठाकरे आणि खा.संजय राऊतांनी जाहिर सभेत पंतप्रधानांच्या उपवास तपश्चर्याची चेष्टा करून खऱ्या अर्थाने हिंदु संस्कृतीचा, राम भक्तांच्या श्रद्धेचा अपमान केल्याची खरमरीत टिका भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली. वास्तविक पहाता ज्यांना कधीच श्रद्धा आणि उपवासाच्या गोष्टी माहिती नसतात, ज्यांनी कधी आषाढीला देखील व्रत वैकल्ये केले नाही, एवढेच काय जी मंडळी आज आयुष्यभर भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणाऱ्या काँग्रेसच्या मांडीला मांडी लावुन बसली त्यांना आता केवळ मतांच्या लाचारीसाठी हिंदु धर्माच्या उपवास श्रद्धेवर घाला घालुन आम्ही कसे धर्मनिरपेक्षवादी असल्याचे दाखवावं लागतं हेच खऱ्या अर्थाने दुर्दैव म्हणावे लागेल. खा.संजय राऊत नको ते बोलण्यामुळे बोलघेवडे म्हणून ओळखल्या जातात. त्याहुन अधिक खाण्यापिण्यात मांसाहारी असलेल्या आणि केवळ राजकिय टिका करायची म्हणुन बेताल बडबड करणाऱ्यांची मानसिकता खऱ्या अर्थाने कुठलाही नैतिक अधिकारच त्यांना बोलण्याचा असु शकत नाही. देशाच्या सर्वोच्च संविधान पदावर बसलेल्या व्यक्तीविषयी काय बोलावं ? याचे भान ज्यांना नाही अशांची वायफळ बडबड म्हणजे आदर्श हरवलेल्या नेतृत्वाच्या अंगी आलेले उसणं बळ आणणं असेच म्हणावे लागेल या शब्दांत भाजपा प्रवक्ते कुलकर्णी यांनी उबाठा नेत्यांना ठणकावले.




## द्वितीय मल्हार चषक नावाने जेजुरीत भव्य राज्यस्तरीय कराटे स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** शोतोकोंन ग्लोबल कराटे अकॅडमी आणि पुरंदर स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धा शुभम लॉन्स याठिकाणी आयोजित केल्या गेल्या होत्या या स्पर्धेत मुंबई, पिंपरी चिंचवड, पुणे शहर,वाघोली, भोर तसेच सातारा आदी शहरातून जवळपास 543 विद्यार्थी तसेच विद्यार्थिनी सहभागी झाले होते ......जेजुरी मधील छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल मधील अवघ्या 4 वर्षाच्या 5 विद्यार्थ्यांच्या सहभागाने उपस्थितांच्या माना उंचवल्या गेल्या......PDCC बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे सर यांनी स्वसंरक्षणाबरोबर मनाच्या बळकट्टीसाठी कराटे स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत असे उद्‌गार काढून भविष्यामध्ये अशा स्पर्धांसाठी एक मोठे व्यासपीठ मिळवून देण्याचा आम्ही प्रयत्न करू असे वचन आयोजकांना दिले......
या स्पर्धेचे आयोजन जेजुरी नगरीचे विरोधी पक्षनेते जयदीप बारभाई,गोरख कुंभार तसेच पुरंदर स्पोर्ट्स असोसिएशन चे संस्थापक अशोक शिंदे यांनी केले होते.

प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी चे तालुकाध्यक्ष माणिक झेंडे पाटील, नगरसेवक अजिंक्य देशमुख, रविंद्र शेठ जोशी उद्योजक महेश म्हत्रे साहेब उद्योजक मार्तंड देवसंस्थान चे विश्वस्त मंगेश घोणे, श्री पद्मावती एज्युकेशन सोसायटी च्या संचालिका प्रियांका पवार, माजी विश्वस्त पंकज निकुडे, कात्रज दूध संघाचे संचालक तानाजी जगताप, सूकलवाडी चे सरपंच संदेश पवार, ND नाना जगताप, प्रशांत लाखे ,संतोष बायास, ससून रुग्णालय चे डॉ प्रशांत दरेकर, आदी मोठ्या संख्येने जेजुरी मधील ग्रामस्थ माता भगिनी उपस्थित होत्या....अखिल भारतीय कराटे चे अध्यक्ष सीताराम चव्हाण,संजय शिंदे, संदीप वाकचौरे,सुधीर गडलिंग,योगेश मोरे,हेमचंड गवई ,मयुरी थोरात आदींचे मार्गदर्शन या स्पर्धेसाठी लागले......स्पर्धा यशस्वी होण्यासाठी पवार क्रेन्स सर्व्हिस चे हरिभाऊ पवार, मल्लु शेठ कोळी, विठ्ठल धाब्याचे अजय जगताप, शेखर बारभाई,भाविक सर ,निशांत शिंदे , यांनी मोलाचे योगदान दिले......कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रस्ताविक छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल चे संस्थापक श्रीकांत पवार यांनी केले तर आभार पुरंदर स्पोर्ट्स चे कराटे प्रशिक्षक निशांत शिंदे यांनी मानले.

## बाळासाहेब खरात, उमेश जैन यांचा पदवीधर शिक्षक, केंद्रप्रमुख सभेतर्फे सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यामध्ये पदोन्नतीची प्रक्रिया पारदर्शक व जलद पद्धतीने राबविल्या बद्दल महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा जिल्हा बुलढाणा च्या वतीने शिक्षणाधिकारी (प्रा.) मा. श्री. बाळासाहेब खरात तसेच उपशिक्षणाधिकारी उमेश जैन यांची सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन दि. २४ जानेवारी रोजी सन्मान करण्यात आला व प्रशासनाचे आभार माननण्यात आले. बुलढाणा जि.प.मध्ये मागील दहा वर्षांपासून केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि मुख्याध्यापक यांची असंख्यपदे रिक्त होती. या रिक्त असलेल्या पदांवर प्राथमिक शिक्षकांमधून पदोन्नती करण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला होता. नुकतीच उपरोक्त तीनही प्रकारची पदे पदोन्नतीने भरण्यात आली , त्यामुळे जिल्ह्यातील अनेक शिक्षकांना विस्तार अधिकारी , केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक या पदांवर पदोन्नती मिळाली . त्यामुळे अनेक शिक्षक बांधवांना न्याय मिळाला. त्याबद्दल संघटनेच्या वतीने प्रशासनाचे आभार मानन्यात आले. यापुढील काळात सुद्धा रिक्त असलेल्या पदांची माहिती संकलित करून ती पदे भरणार असल्याचे सुतोवाच शिक्षणाधिकारी मा श्री. बाळासाहेब खरात यांनी केले. याप्रसंगी सत्कार करताना महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभेचे जिल्हाध्यक्ष टी के देशमुख तसेच गणेश लोखंडे सर.





## माय मराठीने भरभरून दिले : अजीम नवाज राही

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जीवन जगत असताना अगोदर उर्दू भाषेमध्ये सातवीपर्यंत शिक्षण घेतलं त्यानंतर एस .एस हायस्कूलमध्ये आठवी वर्गामध्ये प्रवेश घेतला परंतु कसेबसे दहावीपर्यंत शिक्षण घेतलं गरीब परिस्थिती असल्यामुळे गणित व इंग्रजीमध्ये कधी जमलं नाही त्यामुळे दहावीच नापास झालो परंतु आज रोजी माझ्या कविता ह्या दहाव्या वर्गाला बाराव्या वर्गाला व दहा विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमाला आहेत ही सर्व देणे ही माय मराठीची असल्याचे प्रतिपादन साखरखेर्डा येथील प्रख्यात कवी नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांनी एस ई एस हायस्कूलच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये प्रमुख वक्ते म्हणून सत्काराला उत्तर देताना बोलताना केले.

ते पुढे म्हणाले की माय मराठी ने भरभरून दिले दिवसभर मराठी आणि रात्रीला उर्दू बोलत असल्यामुळे दोन्ही उर्दू आणि मराठी मायनी भरभरून दिले ,असे सुद्धा राही यांनी सांगितले. एस ई एस हायस्कूल ला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दि २४ जानेवारीला आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून साखरखेर्डा गावचे भूमिपुत्र लातूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक सुधीर खिरडकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रख्यात कवी अजीम नवाज राही दिव्य सेवा प्रकल्पाचे संचालक अशोक काकडे,तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सा . ए . सो . सचिव चंद्रशेखर शुक्ल, प्रमुख पाहुणे म्हणून,साखरखेर्डा सरपंच सुमनताई जगताप, श्रीमती डॉक्टर जयश्रीताई वसंतराव देशपांडे,घनश्याम जोशी कोषाध्यक्ष सा.ए.सो., कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल तुपकर,माझी उपसभापती सुनील जगताप गोरेगावचे माजी सरपंच पती संजय पांचाळ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिलीप बेंडमाळी,तंटामुक्तीचे अध्यक्ष संतोष बेंडमाळी, मा . प्रा . दसरे , प्रा ढोरे , काळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप खिल्लारे रंजीत खिल्लारे, डॉ. अभिषेक शुक्ला, पत्रकार संतोष गाडेकर गजानन इंगळे,ज्येष्ठ पत्रकार डि . एन पांचाळ,ग्रामपंचायत सदस्य संग्रामसिंग राजपूत,ग्रामपंचायत सदस्य देवानंद खंडागळे, विस्तार अधिकारी व्ही . व्ही . गवई, शुभम राजपूत ,विष्णू गायकवाड दत्ता घोडके, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाजूला सर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जोशी सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी . डी . गवई यांनी केले, कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष ठाकूर पवन देशमुख अमोल कवळे राजू दाभेकर गौतम जाधव पवन खरात यांनी परिश्रम घेतले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर